C M Y K

|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० अंक : ९ सोमवार दि. २१ फेब्रुवारी २०२२ ते रविवार दि. २७ फेब्रुवारी २०२२ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## शरीरसुखाला चटावलेला प्रियकर चिडला रागाच्या भरात प्रेयसीचा मुडद्याच पाडला

पुणे/क्राईम रिपोर्टर

एखाद्या माणसाला त्याच्या संपर्कात आलेल्या बाईने एकदा का शरीर सुखाची चटक लावली कि मग त्या सुखासाठी तो दिवाना होतो. मात्र जी बाई असते ती किती जरी चालू असली तरी तिला समाज आणि नातेवाईकांची भीती असते. पुण्याच्या लोहगावमध्ये राहणाऱ्या शबाना काल्पनिक नाव हिचे तिच्याच घरात राहणाऱ्या भाडोत्र्याशी अनैतिक संबंध होते. मात्र या संबंधाची कुणकुण तिच्या नातेवाईकांना लागताच त्यांनी तिला सज्जड दम दिला. त्यामुळे ...पान २ वर

## पैशांसाठी गरीब मुलींच्या अब्रुचा लिलाव केला बंटी-बबलीच्या सेक्स रॅकेटचा पर्दाफाश झाला

पालघर/क्राईम रिपोर्टर



सेक्स ही माणसाची गरज असली तरी त्याला संस्कृती आणि सभ्यतेच्या मर्यादा आहेत. पण आजकाल या मर्यादा पाळल्या जात नसल्याने समाजात मोठ्या प्रमाणावर व्यभिचार आणि लैंगिक हिंसाचार बळावलाय आणि सध्या तर लोकांनी सेक्सचा बाजार मांडला आहे. ज्यांच्यावर समाजाला दिशा दाखवण्याची जबाबदारी आहे असेच काही प्रतिष्ठीत लोक सेक्स रॅकेट चालवत आहेत आणि त्यासाठी गरीब असहाय्य अल्पवयीन मुली आणि विवाहित महिलांचाही वापर केला जातोय. खास करून जिथे अन्नाविश्व दारिद्र्य आहे अशा आदिवासी पट्ट्यातील गरीब मुलींना पैसा आणि नोकरीचे आमिष दाखवून त्यांना देहविक्रीच्या धंद्यात ढकलले जात आहे. हा विषय केवळ देहविक्री पुरताच मार्यादित राहिलेला नाही, तर आता सेक्स रॅकेट चालवणारे लोक अल्पवयीन मुली ज्या ग्राहकांना पुरवतात त्यांना बदनामी पोलीस कारवाईची धमकी देवून त्यांना ब्लॅकमेल करीत आहेत आणि अशा धंद्यात पैसा भरपूर मिळत असल्याने काही राजकीय पक्षांचे पदाधिकारीही सेक्स रॅकेटच्या धंद्यात सक्रीय झाले आहेत. त्यासाठी पालघर सारख्या आदिवासी जिल्ह्यातील मुलीना त्यांच्या गरिबीचा फायदा घेऊन या धंद्यात आणले जात आहेत आणि त्यांचे आयुष्य उध्वस्त केले जात आहे. पालघरमध्ये नुकत्याच अशा एका सेक्स रॅकेटचा परदाफाश झाला असून भाजपचे पदाधिकारी असलेले एक विवाहित जोडपे हे सेक्स रॅकेट चालवत असल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे. या प्रकरणी पालघर पोलिसांनी एक ग्राहक आणि एक महिला दलाल यांना अटक केली असून सेक्स रॅकेट चालवणारे ते जोडपे फरारी आहे. पोलीस आता त्यांचा शोध घेत आहेत. मात्र हा प्रकार उघडकीस आल्याने संपूर्ण पालघर जिल्ह्यात मोठी खळबळ माजली आहे.




भाजपचे पदाधिकारी असलेले अपर्णा आणि आनंद हे बागुल दांपत्य पालघरमधील गरीब आदिवासीं मुलीना पैसे मोबाईलचे आमिष दाखवायची आणि पालघर मधील वेगवेगळ्या रिसोर्ट, हॉटेल्स आणि लॉजवर ग्राहकांसोबत पाठवायचे. नंतर आनंद बागुल हा त्या ठिकाणी जाऊन आपण क्राईम ब्रांचचे अधिकारी आहोत असे सांगून त्या मुलीशी शरीरसंबंध करणाऱ्या ग्राहकावर गुन्हा दाखल करायची धमकी देऊन त्याला ब्लॅकमेल करून त्याच्याकडून पैसे उकळायचे. असा अपर्णा आणि आनंद यांचा धंदा होता. त्यांच्या या सेक्स रॅकेटमध्ये मेहक पिंगडे नावाची एक महिलाही होती. दरम्यान पालघरमध्ये कुरियरच्या धंद्यानिमित्त नेहमी येणाऱ्या कांजी कोठारी याच्यावर बागुल दांपत्याची नजर पडली आणि त्याला लुटण्याचा त्यांनी प्लान केला. त्यानुसार मेहक मार्फत त्याला एक अल्पवयीन मुलगी दाखवण्यात आली आणि त्याला त्या मुलीबरोबर एका हॉटेलमध्ये पाठवण्यात आले. त्यानुसार कोठारी त्या मुलीसोबत गेला. मात्र त्यांची रासलीला सुरु असताना ठरल्या प्रमाणे आनंद बागुल तिथे पोलीस अधिकारी बनून पोहचला व तुझ्यावर आता गुन्हा दाखल करणार असे सांगून त्याने १५ लाखांची मागणी केली. मात्र आपल्याकडे इतके पैसे नाहीत असे कोठारी सांगू लागला. अखेर दीड लाखांवर तडजोड झाली. मात्र भाजपची पदाधिकारी असलेल्या आणि वेंचर फाऊंन्डेशन नामक संस्थेची सल्लागार असलेल्या अपर्णावर गुन्हे दाखल असल्याची माहिती कोठारी याला मिळाली. आपण सुद्धा या प्रकरणात अडकू अशी कोठारीच्या मनात भीती निर्माण झाली आणि ...पान २ वर

## दुहेरी खुनाला अखेर वाचा फुटली पिता पुत्राला ठार मारून संपत्ती लुटली



मयत नानासाहेब



मयत अमित



नाशिक/क्राईम रिपोर्टर

एखाद्याची मालमत्ता हडप करायची असेल तर अगोदर त्याची माहिती घ्यावी लागते. त्यासाठी त्याच्या कुटुंबातील एखाद्या माणसाला आपल्या जाळ्यात ओढून त्याला दारू सारख्या व्यसनात गुरफटून ठेवावे लागते. कारण दारूच्या नशेत माणूस खरे बोलतो. नाशिकमधील शेअर ट्रेडर्स राहुल जगताप याने असेच केले. नानासाहेब कापडणीस या माजी कुलसचिवांची संपत्ती हडप करण्यासाठी त्याने त्याच्या मुलाला दारूचे व्यसन लावून त्याच्याकडून कापडणीस यांच्या संपूर्ण संपत्तीची माहिती घेतली आणि नंतर अत्यंत निर्घुणपणे बाप बेट्यांची हत्या केली. मात्र आरोपी किती जरी हुशार असला तरी पोलीस त्याच्या दोन पावले पुढे असतात. म्हणूनच पोलिसांनी दोन महिन्यांनी का होईना या दुहेरी हत्येचा छडा लावून आरोपीला अटक केली.

मुक्त विद्यापीठाचे माजी कुलसचिव नानासाहेब कापडणीस (७०) तसेच त्यांचा डॉक्टर पुत्र अमित कापडणीस (३५) यांची मालमता हडपण्याच्या उद्देशाने हत्या करण्यात आल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. दोघे पिता पुत्र गेल्या २८ जानेवारीपासून बेपत्ता असल्याची खबर नानासाहेबांची मुलगी शितल कापडणीस यांनी पोलिसात दिली होती. पोलिसांनी तपासकामी नानासाहेब यांच्या बँक खात्याची माहिती घेतली असता शेअर्स विक्रीचे नव्वद लाख रुपये संशयित राहुल गौतम जगताप याच्या बँक खात्यात वळते झाल्याचे आढळून आले व गुन्ह्याच्या तपासाला दिशा मिळाली. शेअर ट्रेडर असलेल्या संशयीत राहुल जगताप याला तातडीने ताब्यात घेत अटक करण्यात आली. न्यायालयाने त्याला दहा दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. अतिशय किचकट गुन्हा तब्बल दोन महिन्याच्या कालावधीनंतर सरकारवाडा पोलिसांनी उघड केला आहे. १८ डिसेंबर ते २८ जानेवारी या कालावधीत नानासाहेबांचा फोन संशयित राहुलच्या ताब्यात होता. तो फोन राहुल हाताळत होता. त्यांचे शेअर्सचे व्यवहार देखील तो मोबाईलच्या माध्यमातून हाताळत होता.

नानासाहेब कापडणीस यांची पत्नी व मुलगी शितल हे दोघे पवई (मुंबई) येथे रहात होते. नाशिकच्या पंडित कॉलनीतील ...पान २ वर

## मुलापेक्षा अधिक होता प्रियकराचा लळा जन्मदात्या आईने दाबला मातृत्वाचा गळा




नारायणगाव/क्राईम रिपोर्टर

शरीरसुखाला चटावलेली बाई त्या एका आपल्या संसाराचा किंवा रक्ताच्या नात्याचा सुद्धा विचार करीत नाही. कधी कधी या सुखासाठी ती मातृत्वाचाही बळी द्यायला मागे पुढे पाहत नाही. पुणे जिल्ह्यातील येडगाव येथील अशाच एका घटनेत आईच्या अनैतिक संबंधाला विरोध करणाऱ्या पोटच्या पोराचा आईनेच खून केला आणि मातृत्वाला कलंक लावला. या प्रकरणी नारायणगाव पोलिसांनी आरोपी महिलेला अटक केली आहे.

येडगाव येथे भाड्याने राहणारी विद्या कदम हि हॉटेलमध्ये साफ सफाईचे काम करायची. मात्र ती बाहेरख्याली असल्याने १० वर्षापूर्वीच पतीपासून वेगळी झाली होती. तिचा मुलगा पतीकडे राहायचा. मात्र चार महिन्यापूर्वी तिने त्याला कपडे ...पान ६ वर

## शरीरसुख देण्यास तिने नकार दिला मित्राने मित्राच्या पत्नीचा खून केला

डोंबिवली/श्रीराम कांदू

एका ३३ वर्षीय विवाहितेची निर्घृण हत्या करून तिचा मृतदेह घरातील सोफ्यात लपवून ठेवणाऱ्या आरोपीला मानपाडा पोलिसांनी अटक केली केली आहे. विशेष म्हणजे एका चपलावरून पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत आरोपीपर्यंत पोहचून त्याला ताब्यात घेतल्यानंतर हत्येचे धक्कादायक कारण पुढे आले आहे. विशाल भाऊ घावट (२५) असे अटक आरोपीचे नाव आहे. तर सुप्रिया शिंदे (३३) असे मृतक विवाहितेचे नाव आहे.





मयत सुप्रिया

मृत सुप्रिया, पती किशोर शिंदे (३३)१० वर्षाचा त्यांचा मुलगा डोंबिवली पूर्वेतील दावडी गावातील ओम रेसिडन्सीमध्ये राहतात. पती किशोर हा मंगळवारी सकाळच्या सुमारास कामावर गेला होता. त्यावेळी सुप्रिया ही घरात एकटीच होती. मात्र संध्याकाळी पती किशोर हा कामावरुन घरी पसरला तेव्हा सुप्रिया घरात आढळून आली नव्हती. त्यामुळे तिचा शोध घेतला नातेवाईकांकडे चौकशी सुरु केली. मात्र ती कुठेही आढळून आली नाही. अखेर मंगळवारी रात्रीच्या सूमारास पती किशोर पत्नी बेपत्ता झाल्याची तक्रार देण्यासाठी मानपाडा पोलिस ठाण्यात गेला असता, त्याच्यासोबत आरोपीही गेला होता. याच दरम्यान काही शेजारी आणि नातेवाईक शिंदे यांच्या घरी आले. त्यांना घरातील सोफा पाहुन संशय आला, त्यांनी सोफा उघडून पाहिला, सोफ्यात सुप्रियाचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी गुन्हयाचा तपास सुरु असता मृत विवाहितेच्या घराचे बाहेर त्यादिवशी ...पान २ वर

## मित्राच्या बायकोने भाव नाही दिला चिडलेल्या मित्राने मित्राचा खून केला

आळंदी/क्राईम रिपोर्टर



मयत लक्ष्मण

आजकाल कुणावरही पटकन विश्वास ठेऊ नये. कारण कोण कधी केसाने गळा कापिल याचा नेम नाही. मित्राच्या बायकोवर वाईट नजर ठेवणाऱ्या अशाच एका मित्राला मित्राच्या बायकोशी संबंध ठेवण्यास अपयश आले. त्यामुळे त्याने तिच्यावरचा राग तिच्या पतीवर म्हणजेच आपल्या मित्रावर काढला आणि त्याला दिलेले उसने पैसे परत घेण्याच्या नावाखाली त्याच्याशी भांडण करून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.

लक्ष्मण यशवंत शिंदे हा ३१ वर्षीय तरूण कोयाळी येथे पत्नी सुनिता आणि दोन मुलासह राहयला आहे. तो मोलमजुरी करून आपल्या कुंटूबाचा उदरनिर्वाह करीत असे. त्याची ओळख गावातीलच सुनिल जयवंत पांढरे आणि कोंडिबा लहू कांबळे याच्याशी होती. ते तिघे ही मित्र असल्या कारणाने त्याची नेहमी उठबस होत होती.त्यातून त्याचेत कामाचा शिणवटा घालविणेसाठी कधी कधी दारूच्या पार्टया होत होत्या. सुनिल हा नेहमी लक्ष्मण याच्या घरी येत जात असल्याने त्याची ओळख ही लक्ष्मण याची पत्नी सुनिता हिच्याशी चांगली झालेली होती.तिला तो वहिनी म्हरूनच बोलवत होता. तर ती ही त्याला भावोजी म्हणूनच बोलवित होती. ...पान २ वर

## प्रेयसीने सोडली प्रियकराची साथ संशयाने केला गोरखनाथाचा घात



मयत गोरख

नाशिक/क्राईम रिपोर्टर



पहिले प्रेम सहसा विसरता येत नाही आणि त्यापासून माणसाला दुरही होता येत नाही. पण अशावेळी कुटुंबातील लोक मुलीवर दबाव टाकून तिला दुसऱ्याबरोबर लग्न करण्यासाठी तयार करतात. अशावेळी तिला येणारी स्थळ त्या मुलीला पसंत करूनही नंतर नकार देऊ लागली. तर या लग्नात त्या मुलीचा प्रियकरच अडसर निर्माण करतोय. तोच आलेली स्थळे घालवतोय असा मुलीच्या पालकांना संशय येऊ लागतो. नाशिक जिल्ह्यातील लोहणेर गावात असेच झाले. मुलीचे प्रेम असल्याचे ठाऊक असूनही पालकांनी तिचे पैसेवाल्या मुलाशी लग्न करायचे ठरवले. मात्र मुलीला पसंत करूनही नंतर नकार दिला जात होता. त्यामुळे हे तीच प्रियकराच करतोय असा तिच्या पालकाच्या मनात संशय आला आणि त्यांनी सर्वांनी मिळून त्या प्रियकराची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.

गोरख काशिनाथ बच्छाव हा तरुण नाशिक जिल्ह्याच्या देवळा तालुक्यातील लोहणेर येथील रहिवासी होता. तरुणपणात पदार्पन केलेला गोरख उदरनिर्वाहासाठी उत्पन्नाचा मार्ग शोधत होता. दरम्यान मालेगाव तालुक्यातील रावळगाव येथील गोरखचे नातेवाईक गोकुळ सोनवणे यांनी त्याला रोजगारासाठी आपल्याकडे बोलावून घेतले. तो गोकुळ सोनवणे यांच्याकडे राहण्यास आला. गोकुळ सोनवणे यांनी त्याला प्लंबिंगचे काम मिळवून दिले. रावळगाव येथील गोकुळ सोनवणे यांना दोन मुले व एक मुलगी आहेत. गोकुळ सोनवणे यांना कल्याणी नावाची मुलगी आहे. गोकुळ सोनवणे यांच्या परिवारात राहून गोरखने प्लंबीगच्या कामात जम बसवला. प्लंबींगच्या कामातून त्याला धनप्राप्ती होऊ लागली. दरम्यान गोकुळ सोनवणे यांची मुलगी कल्याणी व गोरख यांचा सहवास जुळून आला. गोकुळ सोनवणे यांची मुलगी कल्याणी देखील तरुण झाली होती. ती तेवीस वर्षाची झाली होती. गोरख हा देखील लग्नायोग्य झाला होता. कल्याणी देखील लग्नायोग्य झाली होती. ...पान २ वर

## धारावीत रिक्षावाला भाई बनायला गेला 'के' कंपनीच्या हातून विनाकारण मेला

मुंबई/एस.कुमार

मुंबईतील धारावी सारख्या आशिया खंडातील सर्वात मोठ्या झोपडपट्टीत आजही गुन्हेगारी टोळ्यांचे वर्चस्व आहे आणि या टोळ्यांच्या विरोधात जो कुणी जाईल त्याचे दिवस भरले म्हणून समजा! धारावीत अशीच एक के कंपनी आहे. या टोळीचा धारावीत मोठा दबदबा आहे. मात्र अमीर खान नावाचा एक रिक्षावाला इथे नव्यानेच भाई बनून उदयाला येत होता ते के कंपनी या गुंडांच्या टोळीला सहन झाले नाही आणि एकेदिवशी त्यांनी अमीर खान याला गोळ्या घालून ठार मारले. पोलिसांनी या प्रकरणी सात जणांच्या टोळीला अटक केली असून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे जप्त केली आहेत.



सपोनि जाधव



सपोनि माळी



सहउपोनि अंकुश

१२ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० ते १०.४५ च्या दरम्यान आमिर अनिस खान (वय ३०) हे धारावी परिसरातील पिवळा बंगला, राजीव गांधी नगर, मारुती चाळीच्या मागे असलेल्या खाडीच्या बाजूला शौचास चाललं होतं. यावेळी समोरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी आपल्या जवळील अग्निशस्त्रातून आमिर खान यांच्यावर ८ राउंड फायर केले आणि घटनास्थळी वरून पळून गेले. या गोळीबारात जखमी झालेल्या आमिरला तातडीनं सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र अति रक्तस्त्रावामुळे उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी धारावी पोलीस ठाण्यात गु.र क्र.६७/२२, कलम ३०२,३०७,१२० (ब), भा.द.वि. सह कलम ३, २५, २७ भा.ह. का. नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. आमिर अनिस खान हा रिक्षा चालक असून तो आपल्या कुटूंबासह धारावीमध्ये राहत होता. तो रिक्षा चालवून कुटूंबाचा उदरनिर्वाह करत होता, अशी माहिती पोलिसांना मिळाली. मग त्याची गोळ्या झाडून इतक्या अमानुषपणे हत्या का करण्यात आली याचे गूढ होते. सुरुवातीला धारावी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बळवंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा तपास पोलीस करत होत. परतु आमिर खान यांची ददिवसाढवळ्या गोळीबार करून हत्या करण्यात आल्याने या मागे काही गॅंगस्टर किंवा गुन्हेगारी ...पान ६ वर

C M Y K

पान १ वरून....

## पैशांसाठी गरीब मुलींच्या अब्रुचा...

तो पालघर पोलीस ठाण्यात हजर झाला. त्याने घडलेला सर्व प्रकार पोलिसांना सांगितला. त्यामुळे पोलिसांनी कांजी कोठारी, अपर्णा बागुल, आनंद बागुल आणि मेहक यांच्यावर पोस्को कलम ४,८,१२ अन्वये गुन्हा दाखल करून कोठारी आणि मेहक यांना ताब्यात घेतले. तसेच फरारी झालेल्या बागुल दांपत्याचा शोध सुरु केला आहे. भाजपची पदाधिकारी पालघरमध्ये सेक्स रॅकेट चालवत असल्याची माहिती पालघरमध्ये वाऱ्या सारखी पसरताच भाजप विरुद्ध संतापाची लाट उसळली असून आनंद आणि अपर्णा यांना तत्काळ अटक करण्याची मागणी केली जात आहे, तर पालघर पोलीस फरारी आनंद आणि अपर्णाचा शोध घेत आहेत.

## शरीरसुखाला चटावलेला प्रियकर ...

घाबरलेली शबाना आपल्या याराला टाळू लागली. मात्र तो तिच्या सहवासाला इतका चटावला होता कि तिने त्याला जवळ येण्यास मज्जाव करताच त्याला तिचे दुसऱ्याशी संबंध असल्याचा संशय आला आणि त्यातूनच त्याने तिची हत्या केली. पुण्यातील मोझे आळी लोहगाव येथे शबाना (काल्पनिक नांव) ही राहयला आहे. तिच्या काही रूमस भाडयाने दयायचे असल्याने तिने तसे आपल्या ओळखीच्या लोकांना सांगितले होते. तिच्या ओळखीच्या एका कडून बिहार राज्यातील मोहम्मद गुलाब मुक्तार शेख हा तिच्या रुममध्ये भाडयाने राहयला आला होता. तो पुण्यात एके ठिकाणी कामाला होता.त्याची कधी नाईट डयुटी तर कधी डे ड्युटी असल्याने त्याची घरात शबानाबरोबर नजरा नजर होत होती. ती ही दिसायला देखणी आणि सेक्सी असल्याने तिची भिरभिरती नजर त्याने ओळखली होती. तिचा मादक देह बघून तो चेकाळल्यासारखा करीत होता. ती ही त्याला लाईन देत होती. ती त्याच्याकडे नजरेचा कटाक्ष टाकून बोलत असताना त्याच्या काळजाचे पाणी, पाणी होत होते. ती आपल्याला लाईन देत असल्याचे बघून तो ही तिला मिठीत घेण्यासाठी उताविळ झाला होता. एकदा घरी कुणी नसताना त्याने तिला मागून येवून मिठी मारली होती. तिला ही तेच हवे असल्याने तिने खोटा नखरा आणून मला सोडा तुला हे शोभते का असे म्हणाली,त्याने तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत तिच्या गालावरून गाल फिरवित तिला आपलेसे केले. ती ही त्याच्या मिठीत विसावली होती. तो तिच्या नाजुक अवयावरून हात फिरवित असताना तिला ही ती भावना अनावर झाल्याने ती ही त्याला तसा रिस्पॉन्स देवू लागली होती. बघता बघता त्याने तिला नग्न करीत बेडवर नेले, शबानाची आखीव रेखीव जवानी बघून त्याला जोश चढला होता. तो तिच्यावर दमदारपणे चढाई करीत असताना ती ही त्याला खालून तसाच रिस्पॉन्स देत होती. तो तिच्या जवानीचा चोळा मोळा रगडा करीत असताना ती त्याला आपल्या नागडया अंगावर ओढून घेत होती. त्या दोघांचा तो खेळ रंगात आला होता. इश्काच्या खेळात तो माहीर असल्याचे तिने ओळखले होते. मनातील मनात ती म्हणत होती की, आपल्याला दोन्हीकडून दमदार भाडेकरू मिळाला आहे.त्यावेळी त्याने शबानाला दिवसा चांदण्या मोजायला लावल्या. त्याच्या दमदारपणाने ती तृप्त झाली होती. त्यावेळेपासून मोहम्मदला ती आपल्या अगांवर घेत होती. तो तिच्या चिकण्या राणीला भुलला असल्याने ती म्हणेल ती गोष्य तो करीत होता. त्याला पाहिजे ते ती देत असल्याने चमडीसे चमडी मिलाओ असे त्याचे झाले होते. त्या दोघांच्या त्या संबंधाची चर्चा ते राहत असलेल्या परिसरात होऊ लागल्यावर ती सावध झाली होती. ही चर्चा शबानाच्या नातेवाईकांच्यात होऊ लागल्यावर शबाना घाबरली होती. ती अलिकडे मोहम्मदला टाळत होती. तो आला की त्याला ती बाहेरचा रस्ता दाखवित होती. तिच्या अशा वागण्याने तो वैतागलेला होता.ती आपल्याला त्या संबंधाला का नकार देत आहे याचा तो विचार करीत होता. पण त्याचे उत्तर त्याला काही सापडत नव्हते.तिने त्याला आपल्या राणीची अशी काही झलक दाखविली होती की तो तिचा दिवाना झाला होता. पण ती राणीच त्याला ती दाखवित नसल्याने तो तिच्यावर चिडला होता. आपल्या नातेवाईकांत आपले संबंध समजल्याने ती थोडीसी सावध झाली होती.म्हणून ती त्याला टाळत होती. पण याचा नेमका वेगळा अर्थ तो काढत होता. या कारणातून त्या दोघांचे भांडण देखील झाले होते. त्याने तिचे दोन चार माहिन्याचे भाडे ही मुद्दामच थकवले होते.याबाबत ती त्याला काही बोलू ही शकत नव्हती.तो तिचा ठोक्या होत्या. आणि ती त्याची रखेल होती.त्या दोघांचे संबंध वाढीस लागले होते.त्याच्या संबंधाची कुणकुण शबानाच्या नातेवाईकांना लागल्यावर त्यांनी तिला चांगलेच फैलावर घेतले होते.तिला त्याच्याबरोबरचे संबध तोडण्याची तंबी दिली होती.तसे तर ती विवाहिता असल्याने तिला घर प्रपंच होता. तिने त्याच्याकडून पाहिजे तसे सुख ओरबाडून घेतल्याने तिची तहान भागली होती. पण तो मात्र तिच्यासाठी कासाविस होत होता. त्या कामासाठी त्याला ती अजून पाहिजे होती.याच कारणातून तो तिच्याशी भांडत होता. ती मात्र आता आपले संबंध पुरे झाले. नातेवाईकांत आपला सगळा बट्टयाबोळ झाला आहे असे सांगून त्याला टाळत होती. त्यामुळे तो तिच्यावर चिडून होता. बाईने एकदा का त्याला आपली राणीची झलक दाखविली की तो पागल होतो तसेच मोहम्मद याचे झाले होते. ती आपल्याला अंगाला हात लावून देत नाही याचा राग त्याला त्याला आला होता.शबाना राहत असलेल्या मोझे लोहगाव येथील घरात ती दि.६ फेब्रुवारी रोजी बाथरुमध्ये बेशुध्द अवस्थेत आढळली.तिच्या गळयावर कसल्यातरी खुणा दिसत होत्या. म्हणून तिच्या नातेवाईकांनी या संदंर्भात लोहगाव पोलीस स्टेशनशी संपर्क साधला.पोलीसांनी ही तातडीने घटनास्थळी धाव घेवून घटनेची पाहणी करून पंचनामा केला. मृतदेह शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवून दिला.पोस्ट मार्टम रिपोर्ट मध्ये मयताचा गळा आवळ्याने श्वास गुदमरून मृत्यू अशी नोंद होती.म्हणून पोलीस या घटनेचा तपास करीत असताना शबाना विषयी चौकशी करीत असताना तिचे विवाह बाहय संबंध हे मोहम्मद शेख याचेबरोबर असल्याचे माहिती पोलीसांना मिळाली. यावरून पोलीसांनी मोहम्मद शेख याचा शोध घ्यायला विमानतळ पोलीसांनी सुरूवात केली असता तो घटनेनंतर बिहार राज्यात पळून गेला असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. त्याच्या शोधासाठी पोलीसांनी एक विशेष पथक तयार केले. ते बिहार राज्यात पाठविले. संशयीत आरोपी मोहम्मद याच्या मोबाईल कॉलचे डिटेक्शन तपासले होते.त्यावरून तो बिहार मधील आपल्या गावात असल्याची माहिती पोलीसांना मिळाली तो राहत असलेल्या ठिकाणी पोलीसांनी सापळा लावला असता तो पोलीसांच्या सापळ्यात अपसुकच अडकला. पोलीसांनी त्याला ताब्यात घेवून पुणे लोहगाव पोलीस स्टेशनला आणले.त्याचेकडे शबानाच्या हत्येविषयी चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशसाठी केला केला याची माहिती पोलीसांना दिली. घटनेच्या दिवशी तिने त्याला त्या संबंधासाठी नकार दिल्याने चिडलेल्या मोहम्मदने रागाच्या भरात तिचा गळा आवळून धरला .त्यात तिचा मृत्यू झाला असे त्याने पोलीसांना सांगितले.त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने पोलीसांनी त्याचे विरोधात शबानाच्या खून प्रकरणी मोहम्मद गुलाब मुक्तार शेख मुळ रा,.बिहार, सध्या पठारे वस्ती याचे विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता.मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. संशयीत आरोपी मोहम्मद शेख याने तिच्याकडे शरीरसुखाची मागणी केली होती. तिने नकार दिल्याने तिचा गळा त्याने आवळला होता.

## दुहेरी खुनाला अखेर वाचा फुटली...

इमारतीत नानासाहेब व त्यांचा मुलगा अमित असे दोघे जण रहात होते. नानासाहेबांचा मुलगा अमित (३५) हा एमबीबीएस असला तरी तो वैद्यकीय व्यवसाय करत नव्हता. तो कुणात फारसा मिसळत नव्हता. मात्र त्याच इमारतीमधील शेअर ट्रेडर राहुल जगताप याने अमित सोबत मैत्री निर्माण केली होती. तो अमितला नेहमी बिअर पिण्यासाठी घेऊन जात होता. अमितला बिअरची नशा चढल्यानंतर तो त्याच्याकडून नानासाहेबांच्या संपत्तीची सखोल चौकशी करत होता. वडील नानासाहेबांचे नाशिक शहरात चार फ्लॅट असून सावरकर नगरात तिन मजली बंगल्याचे बांधकाम प्रगतीपथावर असल्याचे संशयीत राहुल यास अमितकडून समजले होते. याशिवाय द्वारका येथे एक व्यावसायीक गाळा असल्याचे देखील राहुल यास अमितच्या बोलण्यातून समजले होते. एवढी मालमत्ता नानासाहेबांकडे असल्याचे समजल्यानंतर राहुलने ती हडप करण्याचे मनाशी ठरवले. त्यातून त्याने दोघांची हत्या करण्याचे नियोजन केले. त्यासाठी त्याने अमितला जास्तीत जास्त व्यसनाधिन केले. संशयित राहुल जगताप याने नानासाहेबांची हत्या करुन त्यांचा मृतदेह मोखाडा येथे गोंदेगावातील निर्मनुष्य जागी टाकला. हत्येनंतर त्यांची ओळख पटू नये यासाठी त्यांचा चेहऱ्यावर स्पिरीट टाकून जाळण्यात आला. त्यानंतर दहा दिवसांनी अमित कापडणीस याची हत्या केल्यानंतर त्याचा मृतदेह राजूर (ता. अकोले, जि. नगर) येथे निर्मनुष्य जागी टाकण्यात आला. त्याचा चेहरा देखील जाळून टाकण्यात आला होता. या दोन्ही वेगवेगळ्या घटनांप्रकरणी मोखाडा पोलिस स्टेशनला १८ डिसेंबर २०२१ आणि राजूर पोलिस स्टेशनला २८ डिसेंबर २०२१ रोजी हत्येचा गुन्हा नोंदवण्यात आला. नानासाहेब कापडणीस यांच्या हत्येननतर ते नवीन बंगल्यात राहण्यास गेल्याचा देखावा करत त्याने जुनी पंडित कॉलनी येथील फ्लॅटमधील साहित्य देवळाली कॅम्पला नेले होते. नानासाहेबांची मुलगी शितल हिने फोन केल्यानंतर संशयित राहुलचा गोंधळ उडाला व तिला शंका आली. मोबाईलवर फोन केल्यानंतर नानासाहेब उपलब्ध होत नव्हते. त्यांचा मोबाईल फोन संशयीत राहुल हाताळत असे. नानासाहेबांच्या मुलीने सरकारवाडा पोलिस स्टेशनला २८ जानेवारी वडील आणि भाऊ ( रा. आनंद गोपाळ पार्क, नाशिक) हे बेपत्ता झाले असल्याची तक्रार दिली. सहायक पोलिस निरीक्षक यतिन पाटील यांनी तपासाला सुरुवात केली. तपासात पोलिसांनी नानासाहेबांचे बँक खाते, डिमॅट खाते व इतर सर्व आर्थिक व्यवहार तपासून काढले. नानासाहेब रहात असलेल्या इमारतीत राहणारा संशयित राहुल जगताप याने त्यांचे शेअर्स विक्री करुन आलेली रक्कम स्वत:च्या खात्यात वर्ग केल्याचे आढळून आले. तपासाअंती त्यांची हत्या राहुल यानेच केल्याचे उघड झाले आहे. कापडणीस यांची शहर व परिसरातील करोडो रुपयांची मालमत्ता गडप करण्यासाठी खून केल्याचे त्याने कबुल केले. शेअर्स विकून आलेल्या रकमेतून त्याने भावाच्या नावे रेंज ओव्हर कार खरेदी केली. दोघांचे मृतदेह परजिल्ह्यात जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला.वरिष्ठ पोलिस निरीक्षक साजन सोनवणे, यतिन पाटील, मच्छिंद्र कोल्हे यांच्या पथकाने या तपासकामी सहभाग घेतला.

## शरीरसुख देण्यास तिने नकार...

दुपारी एक चपल दिसल्याची माहिती समोर आले. त्यानंतर पोलिसांनी मृतकच्या पतीला मोबाईल ॲपव्दारे वेगवेगळ्या प्रकारच्या चपला दाखविण्यात आल्या होत्या. त्यामधील एक चप्पल ओळखुन मृतकच्या घराचे बाहेर असलेली चप्पल नमुद चपलेशी मिळती जुळती असल्याचे सांगितले. सदर चपलेवरून पोलिसांनी तपास केला असता मृतकाचा पती याचा मित्र विशाल घावट हा अशा प्रकारची चप्पल घालत असून तो शेजाऱ्याच्या इमारतीमध्ये राहत असल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणी केली असता एका फुटेजमध्ये आरोपी विशाल याच्या पायात तीच चपल दिसली. त्यानंतर पोलिसांनी याच माहितीवरुन संशयीत म्हणून विशाल याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी सुरु केली. आरोपी विशाल याला ताब्यात घेतल्यानंतर सखोल चौकशीतुन धक्कादायक माहिती उघडकीस आली. हत्येचा घटनाक्रम पाहता विशाल हा सोमवार १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता मृत सुप्रिया हिचे घरी जावुन काही पुस्तके तिला वाचायला दिली होती. त्यावेळी त्याने त्याची चप्पल घराचे बाहेर काढली होती. मृत सुप्रिया हीचा १० वर्षाचा मुलगा असल्याने आरोपीने त्यादिवशी मुलाबाबत विचारपुस केली असता सुप्रिया हिने मुलगा दुपारी १२.३० वाजता शाळेत जात असल्याची माहिती दिल्यानंतर पुस्तके देवून आरोपी विशाल निघुन गेला होता. विशेष म्हणजे मृत पतीचा मित्र असल्याने त्याचे वरचेवर घरी येणेजाणे होते. त्यामुळे इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना त्याचा संशय आला नव्हता. मृताच्या घरात दुपारनंतर कोणी नसल्याची माहिती काढून मंगळवारी १५ फेब्रुवारी रोजी पुन्हा आरोपी विशाल दुपारी १.३० वाजता मृत सुप्रिया हिचे घरी पुस्तके देण्याच्या बहाण्याने गेला. त्यावेळी सुप्रिया हिचा मुलगा शाळेत गेलेला होता ती घरात एकटीच असल्याचा गैरफायदा घेवुन आरोपीने तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. मात्र तिने त्याला प्रतिकार करुन दरवाजाकडे जावुन आरडाओरड करण्यास सुरवात केल्याचे पाहून आरोपी विशालने सुप्रियाचे डोके पकडुन फरशीवर आपटण्यास सुरूवात केली. तसेच त्याचे खिशात असलेल्या नायलॉन केबल टायने सुप्रियाचा गळा आवळुन तिला ठार मारले. त्यानंतर तिचा मृतदेह घरातील सोफाकम बेडमध्ये लपवुन घरातून पळ काढला होता. मात्र या हत्येचा गुन्हा केवळ चपलेमुळे उघडकीस आला असून गुन्हयाचा अधिक तपास पोनि अनिल पडवळ हे करत आहे.

## मित्राच्या बायकोने भाव नाही दिला...

तो आपल्या नवऱ्याचा मित्र आहे एवढेच तिला माहित होते. त्यामुळे ती ही त्याच्याशी बोलताना नेहमी चार हात लांबूनच बोलत होती. पण सुनिलच्या मनात मात्र सुनिता ही बसली असल्या कारणाने तो लक्ष्मणच्या माघारी ही त्याच्या घराकडे येत होता. तो घरी नसला की, सुनिताबरोबर तो गप्पा मारत बसत होता.त्याच्या मनात तिच्याबद्दल प्रेम निर्माण झालेले होते. पण तसे तो तिला बोलू शकत नव्हता किंवा आपल्या मनातील इच्छा तो व्यक्त ही करू शकत नव्हता.कारण त्याला तिच्या मनाचा अंदाज ही लागत नव्हता. म्हणून तो काही तरी कारण काढून उगीचच तिच्याशी गप्पा मारण्यासाठी म्हणून येत होता. एकदा दोनदा त्याने तिच्याशी लगट करण्याचा प्रयत्न केला असता तिने त्याला चांगलेच झापले होते. त्यावेळेपासून तो त्याच्या घराकडे जाण्याचे बंद केला होता. ही गोष्ट लक्ष्मण याला माहित नव्हती. त्याच्या पत्नीने याबाबत त्याला कधी काही बोलले नव्हते. पण बाहेर लक्ष्मण आणि सुनिल याचे जमत होते. ते दोघे ही दारू प्यायला एकत्रच बसत होते. मागे एकदा लक्ष्मण याने सुनिल याच्याकडून काही रक्कम हात उसणे घेतले होते. ती रक्कम ही त्याने सुनिलला लवकर परत दिले नाही. सुनिल ती रक्कम सारखा त्याचकेडे परत मागत होता.पण लक्ष्मण ही त्याला आज देतो उदया देतो असे सांगून आपली वेळ मारून नेत होता. ती रक्कम त्याला देण्यामागे सुनिलचा दुसराच हेतू होता कदाचित त्याने ती रक्कम परत लवकर दिली नाही तर त्या रक्कमेसाठी तो लक्ष्मणची पत्नी सुनिता हिच्याकडे लावू इच्छित होता. ती रक्कम लक्ष्मण काही लवकर परत देत नसल्याने एकदा दोनदा त्याने ती रक्कम मागणेसाठी तो त्याचे घरी गेला असता, त्याने ती रक्कम सुनिताकडे परत मागितली. त्यावेळी तिने ही त्याला तुम्ही मला विचारून पैसे दिले होते का? असे उलट विचारले होते. त्याच्या मनातील तिने ओळखले असल्याने तिने त्याला बाहेरचा रस्ता दाखविला होता.त्यामुळे त्याची ती इच्छा पुर्ण होत नसल्याने त्याचे डोके सणकले होते. या रक्कमेसाठी त्याने एकदा दोनदा लक्ष्मण याला ही विचारणा केली होती.पण तो त्याला मी तुझे पैसे परत देणार आहे तू जरा धीर धर असे म्हणत होता.अलिकडे या पैशासाठी सुनिल काही गप्प बसायला तयार नव्हता.ते दोघे दारू पीत असताना सुनिलने ती रक्कम त्याचेकडे परत मागत असताना त्याने त्याच्या बायकोचा विषय काढून तो तिच्या सौदर्याबद्दल बोलू लागल्यावर लक्ष्मणला याचा राग आला.मी तुझे पैसे देणे लागत आहे विनाकारण तू या गोष्टीत घरच्यांना मध्ये घेवू नकोस नाही तर याचे परिणाम गंभीर होतील असा इशारा दिला.त्यावेळी त्या दोघात जोरदार भांडण झाले होते.लक्ष्मणने ही सुनिल कोणत्या हेतूने काय बोलत आहे हे चांगले ओळखले होते.

इकडे सुनिल मात्र आता त्याचेवर चिडून होता. आपल्याकडून पैसे घेऊन उलट आपल्यालाच धमकी देतो म्हणजे काय ?असा तो विचार करीत असताना लक्ष्मण याचा कायमचा काटा कसा काढता येईल असा तो मनात विचार करीत होता.त्याने आपले मित्र कोंडीबा काळे,संतोष काळे,शिवाजी कोळेकर या आपल्या गावातील मित्रांना लक्ष्मण शिंदे याच्या विषयी सांगून आपण त्याचा कायमचा काटा काढूया तो माझे पैसे देणे लागत असून पैसे बुडविण्याच्या हेतूने तो मलाच धमकी देत आहे माझ्यावर खोटे नाटे आरोप त्याच्या पत्नीकडून करीत आहे असे सांगितले. ते तिघे ही लक्ष्मण याला ओळखीत असल्याने आणि त्यांना ही तो सुनिल पांढरे याचे पैसे देणे लागत असल्याचे माहित होते. म्हणून ते ही त्याची गेम करायला आणि सुनिलला मदत करायला एका पायावर तयार झाले. त्यासाठी त्यांनी एक प्लॅन केला. लक्ष्मण शिंदे याची गेम करायची आणि त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट ही लावायची म्हणजे कोणला काही कशाचीच शंका येणार नाही. त्यासाठी दि.१३ फेबुवारीला संध्याकाळी कोडिबा काळे याने लक्ष्मण याच्या मोबाईलवर संपर्क साधून आज जेवायला आणि प्यायला बाहेर जायचे आहे तू ये असे त्याला सांगितले.त्याने तसा निरोप दिल्यावर लक्ष्मण ही त्यासाठी तयार झाला. पण त्याला कसली तरी शंका आल्याने तो त्यावेळी लवकर घरातून बाहेर पडला नाही. तो लवकर येत नसल्याने सगळा प्लॅन फिस्कटेल म्हणून कोंडिबा काळे आणि संतोष काळे हे त्याला बोलविणेसाठी त्याचे घराकडे गेले. त्यावेळी लक्ष्मण हा घरातच होता.ते कशासाठी आलेत हे त्याला माहित होते.काही तरी कारण सांगून त्याना पाठवायचे या विचाराने तो बाहेर आला.त्यावेळी त्याचेत काही तरी बोलणे चालू असताना ते बोलणे लक्ष्मण याची पत्नी सुनिता हिने ऐकले होते. ते त्याला धमकी वजा बोलत असल्याचे तिच्या लक्षात आले होते. ती त्याला त्याच्याबरोबर जाण्यास विरोध करीत होती पण त्यावेळी कोडिंबा आणि संतोष यांनी लक्ष्मण याला धमकावत आपल्या गाडीवर बसविले. लक्ष्मण याने पत्नी सुनिता हिला आपण जेवायला जातो आहे रात्री उशिरा परत येतो असे सांगून त्याचे गाडीवर बसला. ते तिघे ही गावाबाहेरील एका निर्जन स्थळी दारूच्या आणि जेवणाच्या पार्टीसाठी आले. तेथे अगोदरच सुनिल पांढरे आणि शिवाजी कोळेकर हे होते. ते पाच ही जण आता दारू पित बसले.त्याच्या ठरलेल्या प्लॅनप्रमाणे त्यांनी मुद्दामच लक्ष्मण याला जास्त दारू पाजली. ते पाच ही जण नशेत असताना त्याचेत सेक्सवरून विषय निघाला असताना त्यातील एकटयाने लक्ष्मणच्या पत्नीविषयी नको ते बोलले याचा राग लक्ष्मण याला आला. तो त्याना शिवीगाळ करू लागला. त्यातच सुनिल याने त्याचकडे उसणे दिलेले पैसे परत मागितले. हा सगळा प्लॅन सुनिल पांढरे याने घडवून आणला असल्याचे लक्ष्मण याने ओळखून तो ती पार्टी अर्धवट साहून जायला निघाला. त्यावेळी रागाच्या भरात असणाऱ्या सुनिल याने त्याला अडवून खाली पाडले तर इतरांनी त्याला लाथा बुक्क्यांनी मारहाण करायला सुरूवात केली. तो खाली पडल्यावर ओरडत असताना सुनिल याने त्याच्या डोक्यात लोखंडी रॉड घातला. त्यासरशी त्याचे डोके फुटून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. तो रक्ताच्या थारोळ्यात पडला असताना परत सुनिल याने त्याचे डोक्यावर, पाठीवर आणि चेहऱ्यावर लोंखडी रॉडने घाव घातले. त्यासरशी तो निपचिप पडला. आता त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा ते विचार करीत असताना त्यांनी त्याचा मृतदेह एका पोत्यात कोंबला आणि एका दुचाकी वर ठेवून भीमानदीकडे ते आले. रात्रीच्या अंधारात त्यांनी त्याचा मृतदेह त्या पोत्यासकट भीमानदीत टाकून तेथून पोबारा केला. त्या रात्री गेलेला आपला नवरा दुसऱ्या दिवशी सकाळी परत आला नाही म्हणून लक्ष्मण याची पत्नी सुनिता हिने आपल्या नातेवाईकांना घेऊन त्याचा शोध सरू केला होता. पण त्याचा शोध कुठेच लागत नसल्याने तिने अखेर आळंदी पोलीस स्टेशन गाठून आपला नवरा लक्ष्मण शिंदे हा बेपत्ता असून त्याचे अपहरण कोंडिबा काळे व संतोष काळे यांनी केले असल्याची तक्रार दाखल केली. तिच्या तक्रारीनुसार पोलीसांनी बेपत्ता लक्ष्मण शिंदे याचा शोध घेत होते.तरी त्याचा शोध लागत नव्हता तसेच अपहरणकर्ते हे सापडत नव्हते. त्याचे मोबाईल स्विच ऑफ लागत होते. यात दोन दिवस गेले. दि.१६ फेबुवारी २०२२ रोजी निकम वस्ती जवळील भीमानदीच्या पात्रात पोत्यात कोबंलेला एक मृतदेह तरंगताना काही नागरिकांना दिसला. त्यांनी याची माहिती आळंदी पोलीसाना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले.त्यांनी काही नागरिकांच्या मदत्तीने ते पोते नदीतून बाहेर काढले असता त्या पोत्यात एका तरूणाचा मृतदेह छिन्नच्छिन्न अवस्थेत त्याना मिळून आला. त्याचे अंगावर डोक्यावर जाड हत्याराने वार केल्याच्या खुणा दिसत होत्या. त्याचा चेहरा ओळखून येत नव्हता. पोलीसांनी मयताची ओळख पटवून पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची माहिती मयत लक्ष्मण शिंदे याच्या पत्नीने पोलीसांना दिल्याने पोलीसांनी या घटनेतील संशयीत आरोपी सुनिल पांढरे स कोडिबा काळे याना ताब्यात घेऊन त्याचेकडे या घटनेची चौकशी पोलीसांनी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली.या घटनेतील इतर दोघे आरोपी पळून गेल्याने पोलीसांनी त्याचा शोध सुरू ठेवला होता. कथा शब्दबध्द होईपर्यत पोलीस त्याचा शोध घेत होते.मयत लक्ष्मण शिंदे याची पत्नी सुनिता शिंदे हिने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी लक्ष्मण शिंदे याचा खून करून पुरावा नष्ट केल्या प्रकरणी सुनिल पांढरे, कोडिबा काळे, संतोष काळे शिवाजी कोळेकर याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा नोंद करून सुनिल पांढरे व कोडिबा काळे याना मा.कोर्टासमोर उभे केले असता.मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला लोंखडी रॉड व दुचाकी जप्त केली होती. या घटनेतील शिवाजी कोळेकर व संतोष काळे याचा शोध पोलीस घेत होते. या घटनेचा पुढील तपास आळंदी पोलीस करीत आहेत.

## प्रेयसीने सोडली प्रियकराची साथ...

गोकुळ सोनवणे यांच्या एकत्र कुटूंबात कामधंद्यानिमीत राहणाऱ्या गोरखचे कल्याणीवर प्रेम जडण्यास वेळ लागला नाही. दोघांच्या मनात एकमेकांविषयी प्रेमाची पालवी फुटण्यास सुरुवात झाली. दोघे एकमेकांकडे आकर्षीत झाले. बघता बघता दोघे एकमेकांच्या प्रेमात पडले. गोरख आणी कल्याणी हे दोघे नात्यातीलच असल्यामुळे दोघांच्या लग्नाला कुणाचा तसा विरोध नव्हता. दोघांच्या प्रेमाविषयी घरात सर्वांना समजले होते. दरम्यान लग्नायोग्य झालेल्या कल्याणीला इतर नातेवाईकांच्या माध्यमातून स्थळ येण्यास सुरुवात झाली होती. कल्याणी व गोरख यांच्यातील प्रेमसंबंधाची कुणाला माहिती नसल्यामुळे तिला स्थळ येत होते. तिचे गोरखसोबत लग्न करण्यास कुणाचा नकार नव्हता. मात्र दरम्यानच्या कालावधीत तिला येणारे स्थळ गोरखपेक्षा चांगल्या स्वरुपाचे होते. गोरखपेक्षा चांगली कमाई करणा-या उच्च शिक्षीत तरुणांचे ते स्थळ होते. त्यामुळे साहजीकच तिचे वडील गोकुळ सोनवणे आणी त्यांच्या परिवारातील सर्व सदस्यांचे विचार व्यावहारिक झाले. गोरखपेक्षा चांगल्या प्रकारचे स्थळ कल्याणीसाठी चालून येऊ लागल्यामुळे त्यांचे गोरखवरील लक्ष बाजुला झाले. त्यामुळे कल्याणी देखील त्याला टाळू लागली. त्यामुळे आता कल्याणीचा देखील कल चांगल्या स्थळाच्या बाजुने होऊ लागला. एकंदरीत गोरख व कल्याणी यांच्यात दुरावा निर्माण होण्यास सुरुवात झाली. चालून आलेली काही स्थळे कल्याणीने पसंत देखील केली. मात्र का कुणास ठाऊक, आलेली स्थळे नंतर नकार देऊ लागली. काही ना काही कारणाने येणारे स्थळ कल्याणीला नापंसत करु लागले. गोरखमुळेच हाती आलेली चांगली स्थळे नकार देत असल्याचा कल्याणी व तिच्या परिवाराला संशय येऊ लागला. या संशयाची जागा आता वादाने घेतली होती. कल्याणीसह परिवारातील सर्व जण गोरखला दोष देत त्याच्यावर चिडले होते. कल्याणीच्या लग्नात आडकाठी का आणतोस म्हणून सर्वांनी त्याला चांगलेच धारेवर धरले. मात्र आपल्याला काहीच माहिती नाही असे म्हणत त्याने कानावर हात ठेवले. जुळून येणारी स्थळे दुरावत असल्यामुळे घरातील सर्वच जण चिंताग्रस्त होती. गोरखमुळेच कल्याणीच्या ठरणाऱ्या विवाहात अडथळा येत असल्याचा सर्वांचा समज झाला होता. जोपर्यंत गोरख आहे तोपर्यंत कल्याणीच्या विवाहात अडथळा येतच राहील असे सर्वांना वाटू लागले. त्यामुळे गोरखला कायमचा धडा शिकवला पाहिजे या निर्णयाप्रत सर्वजण आले होते. तरीदेखील एक संधी म्हणून त्याला समजावून बघू असे सर्वांनी मिळून ठरवले. शुक्रवार दि. ११ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारच्या वेळी कल्याणी, तिचे आई-वडील व दोघे भाऊ असे सर्व जण रावळगाव येथून गोरखच्या गावी लोहणेर येथे आले. गोरख वासुलपाडे रस्त्यावर उभा असल्याचे त्यांनी पाहिले. त्यामुळे सर्वांनी त्याची तेथेच भेट घेत बोलण्यास सुरुवात केली. आता कल्याणीचा नाद सोड आणी तिच्या लग्नात अडथळा आणू नको असे सर्वांनी मिळून त्याला सांगण्यास सुरुवात केली. मात्र तो कुणाचे ऐकून घेत नव्हता. माझे कल्याणीवर प्रेम आहे व मी तिच्याशीच लग्न करेन असे तो सर्वांना वारंवार सांगत होता. कल्याणीचा नाद सोडण्यास सर्व जण सांगत होते. मात्र लग्न करेन तर कल्याणीसोबतच असा हेका त्याने लावला होता. आता कल्याणीलाच त्याच्याशी लग्न करण्याची इच्छा नव्हती. तरी देखील तो जिद्दीला पेटला होता. दोन्ही बाजुने सुरु असलेला वाद थांबण्याची चिन्हे दिसत नव्हती. अखेर सोनवणे परिवाराकडून गोरखवर हल्ला करण्यात आला. त्याला शिवीगाळ करत लोखंडी रॉड व लाथा-बुक्क्यांनी मारहाण सुरु झाली. पाचही जण त्याच्यावर एकदम तुटूनच पडले. एकीकडे पाच जण व तो एकटा पडला होता. त्याला लोखंडी रॉडने मारहाण सुरु असतांना जिवाच्या आकांताने तो जवळच असलेल्या एका मोबाईलच्या दुकानात गेला. त्याचवेळी चिडलेल्या कल्याणीने त्याच्या अंगावर पेट्रोल टाकले. काही कळण्याच्या आतच तिने पेटती आगकाडी त्याच्या दिशेने भिरकावली. क्षणार्धात आगीच्या ज्वाळांनी त्याला वेढले. जिवाच्या आकांताने सैरभैर होत तो इकडे तिकडे धावू लागला. कुणीही त्याच्या मदतीला आला नाही. अखेर होरपळून दमल्यानंतर तो जमीनीवर पडला. त्यानंतर आलेल्या सोनवणे परिवाराने तेथून पलायन केले. या घटनेची माहिती समजताच नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक सचिन पाटील, अतिरिक्त पोलीस अधीक्षक माधुरी कांगणे, देवळा पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिलीप लांडगे आदींनी घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान त्याला नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. मात्र गंभीर जखमी असल्याने त्याला पुढील उपचारार्थ नाशिक जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तो सुमारे ८० टक्के भाजला होता. पोलिसांनी तातडीने कल्याणी गोकुळ सोनवणे (२३), गोकुळ तोंगल सोनवणे (५७), निर्मला गोकुळ सोनवणे (५२), हेमंत गोकुळ सोनवणे (३०) व प्रसाद गोकुळ सोनवणे (२६), सर्व रा. रावळगाव यांना लागलीच ताब्यात घेतले. रुग्णालयात उपचार सुरु असतांना पोलिसांनी गंभीर जळीत असलेल्या गोरख काशीनाथ बच्छाव याचा जवाब नोंदवला. कल्याणीवर आपले गेल्या सात वर्षापासून प्रेम असल्याचे त्याने पोलिसंना दिलेल्या जवाबात म्हटले आहे. तिचे वडील गोकुळ सोनवणे यांचा आमच्या लग्नाला विरोध होता. त्यामुळे आमचे बोलणे बंद झाल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. माझे तिच्यावर आजही प्रेम असून माझ्यामुळेच तिचे लग्न मोडले असा त्यांचा समज झाला असे त्याने कथन केले. ११ फेब्रुवारी २०२२ रोजी कल्याणीचा भाऊ हेमंतने आपल्या डोक्यात लोखंडी पाईप मारला. प्रसादने लोखंडी रॉड मारुन जखमी केले. गोकुळ सोनवणे यांनी धरुन ठेवल्यानंतर पेट्रोल टाकून जाळण्यात आल्याचे त्याने सांगितले. त्याच्या जवाबानुसार गोकुळ तोंगल सोनवणे, हेमंत उर्फ पप्पू गोकुळ सोनवणे, प्रसाद गोकुळ सोनवणे, कल्याणी गोकुळ सोनवणे व निर्मला गोकुळ सोनवणे या पाचही जणांविरोधात देवळा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. ५२/२०२२ भा.द.वि. ३०७, ३४ नुसार नोंद करण्यात आला. उपचार सुरु असतांना १४ फेब्रुवारी रोजी त्याचे निधन झाले. त्यामुळे सर्व आरोपींविरुद्ध खूनाचे कलम वाढवण्यात आले. या गुन्ह्याचा पुढील तपास देवळा पोलिस स्टेशनचे पो.नि. दिलीप लांडगे व सहकारी करत आहेत.

21 TO 27 FEBRUARY 2022 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 19/02/2022 9:40 PM Page 1



# वसईत दारुच्या हातभट्टीवर पोलिसांचा छापा

## ५ लाखांची गावठी दारू आणि साहित्य जप्त





**वसई/प्रतिनिधी**

वसई पश्चिमेस रानगाव येथे गुरुवारी दुपारी वसई पोलिसांनी केलेल्या कारवाईत गावठी दारू व त्याचे साहित्य असा पाच लाखांचा ऐवज जप्त करून नष्ट केला. वसई तालुक्यातील सर्वात मोठं गावठी दारूचं ठिकाण म्हणून रानगावचं नाव घेतलं जातं. मागील अनेक वर्षापासून मोठ्या प्रमाणात गावठी दारू बनवून ती तालुक्याच्या विविध भागात पोहोचवली जाते. समुद्र किनारा, तिवरांची जंगल, दलदलीचा तसेच नागरी वस्ती पासून दूर असलेल्या हा भाग सदर बेकायदा दारू निर्मिती साठी उपयुक्त ठरला आहे. यापुर्वीही मोठ्या कारवाया या भागात झाल्या आहेत. मात्र गुरुवारची कारवाई मोठ्या अवधी नंतर करण्यात आली आहे.

वसई पोलिसांना प्राप्त झालेल्या माहिती वरुन दुपारी १२.३० वाजता गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सपोनि सुरवसे व सपोनि पवार यांनी पथकासह रानगाव खाडी परिसरात दोन ठिकाणी धाडी घातल्या. यामधे गावठी दारू बनविण्याचे साहित्य ज्यामध्ये एकूण २०० लिटरचे ३० ड्रम ज्यामध्ये प्रत्येकी १५० लिटर चे दारू बनविण्याची मिश्रित रसायन व ३५ लिटर गावठी दारुचा असा एकूण- ४ लाख ८८ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरचे ठिकाण दलदल व खाडीतील असल्याने जप्त साहित्य वसई पोलीस ठाण्यात आणणे अत्यंत अवघड असल्याने पंचा समक्ष जागीच नष्ट करण्यात आले. याबाबतचा गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरु आहे. वसई पोलिसांनी ही कारवाई केल्या नंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग, वसई यांच्या कार्यशैलीवर प्रश्न चिन्ह लागलं आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात गावठी दारू निर्मिती, विक्री आणि वहातुक केली जात असतानाही सदर विभागाला याची सुतराम कल्पना नसावी याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

माहिती देऊनही कारवाई केली जात नाही असा काही नागरिकांचा आरोप आहे. उलटपक्षी माहिती देणाऱ्याला सोबत येऊन ठिकाण दाखवण्यासाठी राज्य उत्पादन विभागा मार्फत सांगितले जाते. यात माहिती देणाऱ्याची ओळख उघड होते. त्यामुळे ही कारवाई होऊच नये असे एकूण कार्यपद्धती राज्य उत्पादन शुल्क वसई विभागाची आहे. यात आर्थिक हितसंबंध असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तूर्तास वसई पोलिसांच्या कारवाई मुळे गावठी भट्टयाची धग अल्पावधीकरता बंद झाली आहे.

# मुंबई–नाशिक महामार्गावर वडपे येथे अपघातात ९ जण गंभीर जखमी



**भिवंडी/आकाश गायकवाड**

मुंबई नाशिक महामार्गावरील वडपे बायपास या ठिकाणी सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास नियंत्रण सुटलेल्या कारची ठोकर लागल्याने रिक्षा व दुचाकी वरील एकूण नऊ जण जखमी झाले आहेत. त्यामधील ६ जणांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना ठाणे जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे तर ३ महिलांना भिवंडी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सकाळी साडे नऊ वाजताच्या सुमारास कंटेनर व त्यांच्या पाठी मागे कार भरधाव मुंबई च्या दिशेने जात असताना अचानक पुढील कंटेनर ने डाव्या बाजूला वळण घेण्यास सुरुवात केल्याने मागील कार चालकाने ठोकर लागण्या पासून स्वतःचा बचाव करण्यासाठी कार भरधाव डाव्या बाजूने पुढे नेण्याचा प्रयत्न केला असता कार चालकाचे कारवरील नियंत्रण सुटल्याने कार थेट रस्ता दुभाजका वरून जाऊन मुंबई कडून नाशिक च्या दिशेने जाणाऱ्या रिक्षा व दुचाकीवर आदळली.या अपघाता तगीता चौधरी, दिव्या चौधरी, संतोषी कोकेरा सर्व रा.कोलीवली ता. भिवंडी तबरेज अन्सारी, सरंत गडग, अक्षय लहांगे, नियाजुद्दीन अन्सारी, साजिद अली, आलम अन्सारी असे रिक्षा मधील सात जण व दुचाकी वरील दोन जण असे एकूण ९ जण जखमी झाले. या मध्ये गोदामात कामाला जाणाऱ्या तीन महिलांचा समावेश आहे. तालुका पोलीस ठाण्यात अपघात गुन्ह्याची नोंद केली गेली आहे.

# चिंचणीतील वादग्रस्त उच्चशिक्षित सरपंचला लाच घेताना रंगेहाथ अटक



**डहाणू/प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यातील चिंचणी ग्रामपंचायतीचे अत्यंत वादग्रस्त ठरलेले आणि त्यांच्या विरोधात अविश्वास ठरावाची सतत मागणी होत असलेल्या उच्चशिक्षित सरपंच कल्पेश धोडी याला आज बोईसरच्या एका हॉटेलात २० हजाराची लाच स्वीकारताना पालघरच्यालाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले. चिंचणी ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये एक नवीन चेहरा, सुशिक्षित उमेदवारांची आवश्यकता असल्याने शिवसेनेने मॅकेनिकल इंजिनिअर असलेल्या कल्पेश धोडी या तरुण उमेदवाराला उमेदवारी दिल्यानंतर स्थानिक मतदारांनी त्यांना भरघोस मतांनी निवडून दिले होते. परंतु अल्प कालावधीत अनधिकृत कामांना परवानगी, घरपट्टी घोटाळा, ग्रामपंचायत निधी गैरकारभार आदी आपल्या वादग्रस्त कारभाराने त्याच्या विरोधात भ्रष्टाचाराचे आरोप होऊ लागले. कल्पेश धोडीवर विरोधी पक्षांसह आपल्याच पक्षातील सदस्यांनी ही भ्रष्टाचाराचे आरोप करून त्याच्याविरोधात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे अविश्वास ठराव ही दाखल केले आहेत. मासिक सभा, ग्रामसभेत छुप्या पद्धतीने ठराव घेत बेकायदेशीर कामाला प्रोत्साहन देत असल्याचे अनेक आरोप त्याच्यावर करण्यात आले होते. तक्रारदार मोहम्मद चुनावाला ह्यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांनी चिंचणी येथे खरेदी केलेल्या जमिनीवर बांधकाम करणे आणि त्यावर उभ्या असलेल्या स्मशानभूमी हटविण्यासाठी सरपंच धोडी यांनी १४ लाख ५० हजाराची मागणी केली होती. त्या अनुषंगाने पहिल्या हफत्यामधील ४ लाख ५० बाजारातील २० हजाराची रक्कम बोईसरमधील मधुर हॉटेलमध्ये स्विकारताना सरपंच धोडी याला पालघरच्या लाचलुचपत विभागाने त्याला अटक केली. पोलीस उपअधीक्षक नवनाथ जगताप, पो नि. स्वपन बिश्वास ह्याच्या नेतृत्वाखाली टीमने अटक केली.

# देवणी पंचायत समिती अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानास मंजुरी

## आ.संभाजी पाटील निलंगेकर यांच्या पाठपुराव्याने १३ कोटी निधी मंजुर

**देवणी/शकिल मनियार**



निलंगा विधानसभा मतदारसंघ अंतर्गत असलेल्या देवणी येथे पंचायत समितीची नुतन व सुसज्ज इमारत तयार झालेली आहे. मात्र पंचायत समिती अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान नसल्याने त्यांची गैरसोय होत होती, ही बाब लक्षात घेवून आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी देवणी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी प्रशासकीय मान्यता देवून निधी उपलब्ध करून दयावा अशी मागणी ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे पत्राद्वारे केलेली होती. त्यासाठी आवश्यक असणारा पाठपुरावा केल्यानंतर यास प्रशासकीय मान्यता मिळालेली असुन १३ कोटी ३ लाख रूपयेच्या निधीस मंजुरी मिळालेली आहे. महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सिमेवर असलेले देवणी हे शहर निलंगा विधानसभा मतदारसंघ अंतर्गत येते,या शहरात आ.निलंगेकर यांच्या प्रयत्नातून पंचायत समितीची नुतन व सुसज्ज इमारत उभारली गेलेली आहे. मात्र पंचायत समिती अधिकारी व कर्मचा-यांसाठी निवासस्थाने बांधण्यात आलेली नव्हती,अधिकारी व कर्मचा-यांची निवासस्थाने नसल्यामुळे मोठी गैरसोय होत होती,परिणामी नागरिकांची कामेही रखडली जात होती, ही बाब लक्षात घेवून आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी निवासस्थान बांधण्यास मंजुरी देवून त्यासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करून दयावा अशी मागणी ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे केली होती, यासाठी आवश्यक असणारा पाठपुरावा ही आ.निलंगेकर यांनी केलेला होता,या पाठपुराव्यास यश आले असुन निवासस्थान बांधकामास प्रशासकीय मान्यता मिळली असुन १३ कोटी ३ लाख ११ हजार रूपयांच्या निधी उपलब्ध झाला आहे. देवणी पंचायत समिती अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आता एकुण २६ निवासस्थाने या निधीच्या माध्यमातून उभारली जाणार आहेत. लवकरच या निवासस्थानाच्या बांधकामास सुरूवात होणार असल्याची माहिती आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी वृत्तपत्र माध्यमांना बोलताना सांगितले आहेत पंचायत समिती अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी मंजुरी मिळणेकरीता आवश्यक असणारा पाठपुरावा आ.संभाजीराव निलंगेकर यांनी केल्याबददल त्यांचे अधिकारी कर्मचाऱ्यासह देवणी शहर व तालुक्यातील नागरीकांतुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# भिवंडीत मोबाईल शॉप, केक शॉप आणि यंत्रमाग कारखान्यात चोरी

**भिवंडी/अभिजित हिरे**

घरफोडीचे सत्र थांबता थांबत नसून एका मोबाईल शॉप सह केक शॉप व यंत्रमाग कारखाना अशा तीन वेगवेगळ्या ठिकाणी घरफोडीच्या घटना घडल्या असून या तीन घटनांची नोंद शांतीनगर व नारपोली अशा दोन पोलिस ठाण्यात रविवारी करण्यात आली आहे.

पहिल्या घटनेत शांती नगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणारे सुरेश रतनलाल जैन (४५) यांचा कल्याण नाका येथे सी डी झोन मोबाईल शॉप असून या मोबाईलचा दुकान असून या दुकानात शनिवारी अज्ञात चोरट्यांनी सेटर ग्रीलचे लॉक तोडून आत मध्ये प्रवेश करून मोबाईल शॉप मधील एक लाख ६३ हजार ९०० रुपये किमतीचे मोबाईल घरफोडी करून चोरून नेले आहेत या प्रकरणी सुरेश जैन यांनी शांतीनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दुसऱ्या घटनेत नारपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारे विक्रम दैवान डोईफोडे (३१) यांनी भाडे त्यांच्या बिअर शॉप च्या बाजूला असलेल्या सनी बाळकृष्ण नाईक यांच्या केकच्या गाड्याचे शटर अज्ञात इसमाने तोडून आत मध्ये प्रवेश करून २८ हजार रुपये रोख रक्कम अज्ञात इसमाने चोरी करून नेली आहे. तर तिसऱ्या घटनेत शांती नगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणारे मुस्ताक अहमद उल्ला खान (४९) यांचा भिवंडीत असलेल्या यंत्रमाग कारखान्याच्या खिडकीच्या वाटे प्रवेश करून वीस हजार चारशे रुपये किमतीचे सतरा नग इलेक्ट्रिक मोटारची चोरी केली आहे या प्रकरणी मुश्ताक खान यांनी शांतीनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून चोरट्यांचा पोलीस कसून शोध घेत असले तरी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# आंतरराज्य टोळीच्या दोन म्होरक्यांना पोलिसांनी केले जेरबंद



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात दरोडे, घरफोड्या करून धुमाकूळ घालणाऱ्या आंतरराज्य टोळीच्या दोन म्होरक्यांना सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले. कामती, मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पाच गुन्हे उघडकीस आणून २ लाख ३१ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असल्याची माहिती सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी पत्रकार परिषदेत दिली. सुखदेव धर्मा पवार (५५) व अंबादास शंकर गायकवाड (३४) असे अटक करण्यात आलेल्या आंतरराज्य टोळीतील दोघांची नावे आहेत. तर सुरेश धर्मा पवार, राजू रज्जूलाल पवार, बापू शंकर काळे, सोहम (राजूचा जावई) विनोद बापू पवार, परसू काळे, गिरमल उर्फ गिरमा अंबादास काळे, गोविंद संजय काळे हे आठ जण अद्याप फरार आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस शोध घेत आहेत. अटकेतील सुखदेव हा सराईत दरोडेखोर आहे, त्यांनी स्वतःची टोळी तयार करून महाराष्ट्रासह, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात देखील दरोडे टाकले आहेत. सोलापूर शहर पोलिसांनी त्यास २०१७ मध्ये अटक केली होती. त्यानंतर तो आजपर्यंत पोलिसांना नेहमी चकवा देत होता.

दरम्यान सुखदेवच्या टोळीने ६ फेब्रुवारी २०२२ रोजी नांदणी परिसरातील हॉटेल निसर्गवर दरोडा टाकला. यामध्ये २० हजारांची रोकड आणि दारूचे २८ बॉक्स चोरून नेले. या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेत असताना सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेने सुखदेवला सापळा लावून पकडले. यानंतर केलेल्या चौकशीतून २०२० व २०२१ मध्ये मंद्रूप व कामती पोलीस ठाण्याच्या हद्दीत केलेल्या घरफोड्यासह फेब्रुवारीत हॉटेल निसर्गवर टाकलेल्या दरोड्याची माहिती सुखदेव पोलिसांना दिली. सुखदेव हा सराईत आणि इतर राज्यात गुन्हे करणारा असल्याचा संशय सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेला आला होता. त्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत सुखदेव ३२ गुन्हे केल्याची माहिती दिली. पोलिसांनी गुन्हा करण्यासाठी वापरण्यात आलेले वाहन आणि दरोड्यातील मुद्देमाल असा २ लाख ३१ हजार ६०० रुपयांचा ऐवज हस्तगत केला आहे.

सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे, मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन थेटे, सहाय्यक फौजदार खाजा मुजावर, नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, धनराज गायकवाड, अक्षय दळवी यांनी केली आहे.

# भिवंडीत पाच जुगार माफियांवर गुन्हे दाखल

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी परिमंडळ दोनचे हद्दीत अवैध जुगार व मटक्याचे धंदे राजरोसपणे सुरू असल्याच्या अनेक तक्रारी भिवंडी पोलिसांकडे येत असल्याने पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण यांनी जुगार व मटका अड्ड्यांवर छापा टाकून जुगार माफियांवर कारवाई करण्याचे निर्देश संबंधित पोलीस कर्मचारी अधिकाऱ्यांना दिले असल्याने भिवंडी शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध जुगार व मटका चालविणाऱ्या दोन जुगार अड्ड्यांवर भिवंडी शहर पोलिसांनी छापा टाकून एकूण पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. धामणकर नाका परिसरात किशोर अनोप्पा अनुपा पुजारी (३७) व महेश रघु पुजारी (२१) हे दोघे धामणकर नाका परिसरात मटका व जुगार साहित्य जवळ बाळगून जुगार व मटका खेळत व खेळत असताना आढळून आल्याने शहर पोलीस ठाण्यात पोलीस शिपाई महेंद्र उबाळे यांच्या फिर्यादीवरून या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर पोलीस हवालदार समीर फकीरा तडवी यांच्या फिर्यादीवरून शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत वराळदेवी हॉस्पिटल हनुमान नगर परिसरात मटका व जुगार चालविणाऱ्या सुनील सत्यनारायण दुस्सा ( वय २१ ) व अजय धनराज पवार ( वय १९ ) मटका जुगार चालवणारा त्यांचा मालक इंदर राजूसिंग टाक यांच्या जुगार अड्ड्यावर छापा मारून या तिघांविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात एकूण पाच जणां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### बाजरा न्युट्रीफीड वैरणीचे शंभर टक्के अनुदान बियाणेसाठी अर्ज करावेत

लातूर : सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी दुभत्या जनावरांना खादय उपलब्धतेसाठी सुधारणा कार्यक्रमांतर्गत (सर्व साधारण योजना) संकरीत बाजरा न्युट्रीफींड वैरणीचे १०० टक्के अनुदानावर बियाणे पशुसंवर्धन विभाग लातूर जिल्हा परीषदे कडून वाटप करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील १० ही तालुक्यातून या योजनेसाठी अर्जदाराकडून अर्ज मागवण्यात येत आहेत. अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपत्रे संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (वि) पं.स/ किंवा नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याकडून उपलब्ध करुन घ्यावेत. पुर्णपणे भरलेले विहित नमुण्यातील अर्ज दिनांक १७ २०२२ ते २८ फेब्रुवारी २०२२ या कालावधीत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्यात जमा करावेत. लाभार्थीची निवड पात्र अर्जामधून सोडत पध्दतीने करण्यात येणार आहे. त्यामुळे १ मार्च २०२२ नंतर प्राप्त होणाऱ्या किंवा अपुर्ण अर्जाच्या निवडीच्या सोडतीसाठी विचार केला जाणार नाही. तरी जास्तीत जास्त संख्येने लातूर जिल्ह्यातील सर्व जातीच्या व्यक्तींनी अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. आर.डी. पडीले यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

### हरभरा खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी करा – संतोष सोमवंशी

औसा : केंद्र शासनाने निश्चित केलेल्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत लातूर जिल्ह्यात जिल्हा मार्केटिंग अधिकारी यादव सुमठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली हरभरा खरेदीसाठी ऑनलाइन नोंदणी सुरू करण्यात आलेली आहे. यासाठी शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी. करावी असे आवाहन संस्थेचे सभापती संतोष सोमवंशी यांनी केले आहे. यावर्षी शासनाने हरभऱ्यासाठी पाच हजार २३० रुपये हमीभाव जाहीर केला आहे. एफएक्यु प्रतीच्या हरभऱ्याला प्रति क्विंटल पाच हजार २३० रुपये दर देण्यात येणार आहे. खरेदी करण्यात आलेल्या हरभरा मालाचे पैसे शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर ऑनलाईन जमा करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांनी NEMl पोर्टल वर ऑनलाईन नोंदणीसाठी आधार कार्ड, सातबारा ८ अ उतारा तलाठ्यांच्या स्वाक्षरीचा पीक पेरा उतारा किंवा हरभरा पिकाच्या नोंद असलेला सातबारा, आधार लिंक असलेले बँक पासबुक झेरॉक्स ही कागदपत्रे घेऊन औसा तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ औसा या कार्यालयात जमा करून नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन संस्थेचे सभापती मा. संतोष सोमवंशी, उपसभापती शेखर चव्हाण, सचिव गणेश क्षिरसागर यांनी केले आहे.

### मनपाकडून महिला बचत गटांना ६ कोटींचे कर्ज वाटप – महापौर

लातूर : दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत शहरी स्वयंरोजगार या घटकामध्ये २५८ महिला बचत गटांना ५कोटी ९३ लक्ष ३९ हजार रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे, अशी माहिती महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी दिली. लातूर शहराच्या विविध भागातील महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगारची संधी निर्माण होण्याच्या दृष्टिकोनातून महिलांना केंद्रबिंदू मानून लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मोठ्या प्रमाणात वितरीत करण्यात येत आहे. चालू वित्तीय वर्ष २०२१-२२ मध्ये राज्य शासनामार्फत ४७ महिला बचत गटांना कर्ज वाटप करण्याचे उदिष्टे देण्यात आले होते. प्रत्यक्षात महानगरपालिकेने २५८ महिला बचत गटांना कर्ज वाटप केले आहे. कर्ज वाटपा मध्ये लातूर महानगरपालिका राज्यात दुसरी आहे. पहिला क्रमांक नागपूर महानगरपालिकेचा आहे. याच बरोबर वैयक्तिक कर्ज प्रस्तावामध्ये ५० लाभार्थ्यांना ५६ लक्ष ६० हजार रु कर्ज वाटप करण्यात आले आहे. २०१५- १६ यावर्षी योजना सुरु झाल्यापासून आजपर्यंत १ हजार महिला बचत गटांना १६ कोटी ७१ लाख कोटी ५ हजार रुपयेकर्ज वितरीत करण्यात आले आहे.मार्च अखेर महिला बचत गटांना कर्ज वाटपात लातूर मनपाचा राज्यात पहिला क्रमांक राहू शकतो अशी माहितीही विक्रांत गोजमगुंडे यांनी दिली. या कर्ज वाटपासाठी मनपा शहर अभियान व्यवस्थापक चंद्रकांत तोडकर, नितीन सुरवसे, लक्ष्मण जाधव, समुदाय संघटक विरेंद्र सातपुते, श्रीमती प्रभावती पाटील परिश्रम घेत आहेत.

### क्रांतीगुरू लहुजी साळवे यांना अभिवादन!

अहमदपूर : येथील क्रांतिवीर लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघ 'लसाकम'च्या वतीने क्रांतीगुरू लहुजी साळवे यांच्या १३८ व्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात घेण्यात आलेल्या या अभिवादन सभेसाठी शिवछत्रपती राज्य पुरस्कार प्राप्त प्रा.डी.बी. गलाले, लसाकमचे जिल्हा उपाध्यक्ष ग्यानोबा घोसे, बी.एम. जंगापल्ले, प्रा.दिलीप भालेराव, सुग्रीव बेले, शिवाजी कांबळे, विश्वांभर जिवारे, गोपीनाथ कांबळे, प्रा.व्ही.व्ही.मोरे, प्रा.पी.बी. पाटील, प्रा.अरूण महाळंकर, संतोष कदम, अनिकेत फुलारी म.राज्य बहुजन शिक्षक महासंघाचे तालुकाध्यक्ष प्रकाश भालेराव, ज्ञानोबा बोडके, संजय पवार, छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुदर्शन पाटील, मेघराज आगलावे, रोहीत गलाले, पत्रकार शिवाजीराव गायकवाड, बालाजी काळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.अभिवादन सभेचे प्रस्ताविक,सूत्रसंचालन व आभार लसाकमचे जिल्हा प्रवक्ते नरसिंग सांगवीकर यांनी केले.

### जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर : जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी विजयकुमार ढगे यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७(१)(३) अन्वये लातूर जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत दि. १६ फेब्रुवारी २०२२ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते दि. २८ फेब्रुवारी २०२२ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे.

# राजकीय स्नान गृहातील नागडे राजकारणी!

अपना मुह काला फीर भी
दुसरो पर ध्यान देते है!
राजनीती के गंदे हमाम मे
सभी नेता नंगे होते है!!

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या शिवसेना आणि भाजपा यांच्यात जो संघर्ष सुरू आहे. त्याने लोकांचं डोकं खराब झालाय. रोज न्यूज चॅनलच्या कॅमेऱ्यासमोर येऊन काहींना काही बोलायचं आणि चॅनलवाल्यांकडे दुसऱ्या बातम्या नसल्याने राजकीय पुढाऱ्यांच्या याच बातम्यांना दिवसभर चघळत बसायचे असा सगळा प्रकार संतापजनक आहे. शिवसेना आणि भाजप दोन वेळा एकत्र सत्तेत होते. तेंव्हा त्यांचा भ्रष्टाचार किरीट सोमय्याला दिसला नाही का? तेंव्हा त्यांचे डोळे फुटले होते काय? त्याच बरोबर एसआरएमध्ये सोमय्या याने केलेला ३०० कोटींचा घोटाळा, आयटी मधला २५ हजार कोटींचा घोटाळा संजय राऊत याला ठाऊक नव्हता. तेंव्हा महाभारतातल्या धृतराष्ट्र प्रमाणे तो आंधळा बनून गप्प का बसला होता आणि आता युती तुटल्यावर एकमेकांचे कपडे फाडून तमाशा दाखवत आहेत. त्यामुळे लोकांनी या दोघांवरही विश्वास ठेऊ नये. कारण दोघेही लबाड आहेत आणि आता लोकांसमोर यांची लबाडी उघडकीस आली आहे. त्यामुळे न्यायालयाने सुमोटो याचिकेद्वारा या दोघांच्याही घोटाळ्यांच्या चौकशीचे आदेश देऊन त्यांना अटक करावी अशी संतप्त प्रतिक्रिया लोक व्यक्त करीत आहेत. संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत पीएमसी बँक घोटाळ्यातील पैसा सोमय्याच्या मुलाच्या कंपनीत गुंतवण्यात आल्याचा आरोप संजय राऊत यांनी केलाय. पत्रवाला चाळीत मोहित कंबोज याचा पैसा गुंतलाय असे संजय राऊत म्हणतात. अरे पण तुमचे सरकार आहे चौकशी लावा. तसेच न्यायालय आहे. तिकडे दाद मागा, ईडी सारख्या तपास यंत्रणा तुमच्यावर अन्याय करीत आहेत असे वाटत असेल तर तुमचे संसदेत खासदार आहेत त्यांना आवाज उठवायला सांगा. इथे पत्रकार परिषदा घेऊन एकमेकांचे कपडे कशापाय फडताय? सोमय्या आणि संजय राऊत यांनी एकमेकांवर केलेले आरोप अत्यंत गंभीर असून मुंबई उच्च न्यायालयाने या दोघांनी एकमेकांवर केलेल्या आरोपांची चौकशी करण्यासाठी सूमोटो याचिका दाखल करून घ्यावी आणि या दोघांचीही चौकशी करून ते दोषी आढळले तर दोघानाही तुरुंगात धाडावे असे जनतेचे म्हणणे आहे. कारण या लोकांनी जे घोटाळे केले आहेत ते जनतेच्या पैशातून झालेले आहेत. त्यामुळे सरकार यांची चौकशी करणार नाहीत. कारण सरकार आणि विरोधी पक्ष दोघेही एकमेकांना सामील आहेत. सकाळी एकमेकांच्या आय मायचा उध्धार करणारे हे संध्याकाळी एकत्र बासून दारू पितात. आज शिवसेना-भाजप वाद सुरू आहे. पण उद्या ते एकत्र एणारच नाहीत असे कुणीही सांगू शकत नाही. कारण राजकारणी कुठल्याही पक्षाचे असोत ते निर्लज्ज असतात आणि जेंव्हा वाटून खाण्याची वेळ येते तेंव्हा ते बरोबर एकत्र येतात. मात्र हे आपल्याला दिसत असून आम्ही त्यांच्या मागे विनाकारण भरकटत जतोय. म्हणून त्यांचे फावले आहे. ज्या दिवशी जनता या लोकांच्या विरोधात दुसऱ्या स्वातंत्र्य युद्धासाठी पेटून उठेल तेंव्हा सर्वच पक्षांच्य पुढारी लोकांना त्यांची औकात कळेल. महाराष्ट्राच्या समोर जनतेच्या जीवन मरणाचा अनेक प्रश्न उभे आहेत. ज्यात अवकाळी पावसाने बरबाद झालेल्या कित्येक शेतकऱ्यांना अजून आर्थिक मदत मिळालेली नाही. पीक विम्याची हप्ते भरूनही विमा कंपन्या नुकसान भरपाई देण्यात टाळा टाळ करीत आहेत. महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण, नोकरभरती परीक्षेतील घोटाळे असे कितीतरी मुद्दे सरकार समोर असताना सध्या सत्ताधारी आणि विरोधक रोज पत्रकार परिषदा घेऊन एकमेकांचे कपडे फाडीत आहेत. इतके असंवेदनशील लोक जगात कुठेही बघायला मिळणार नाहीत. त्यांना लोकांची काहीच पडलेली नाही. सोमय्या आता अण्णा हजारे बनून शिवसेनेला लोकांचे भ्रष्टाचार बाहेर काढीत आहे. अरे पण तुमचे सरकार होते तेंव्हा शिवसेनाही तुमच्या सोबत होती. तेंव्हा सोमय्या याच्या तोंडाला चिकटपट्टी लावली होती का? तेंव्हा तो का गप्प बसला? हाच सोमय्या नारायण राणेंच्या विरोधात बोंबलत होता त्याच्या भ्रष्टाचारावर बोलत होता, आता राणे भाजपात गेल्यावर साधू संत झाला का? आता सोमय्या याची वाचा का बसली? म्हणजे त्यांच्या बरोबर शिवसेना होती, तेंव्हा भ्रष्टाचारी नव्हती आता त्यांची साथ सोडल्यावर भ्रष्टाचारी कशी झाली? आणि जर भ्रष्टाचारी होती तर तेंव्हा सोमय्या का गप्प बसले? राहता राहिला सवाल शिवसेनेचा तर काल संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेच्या निमित्ताने जी ड्रामेबाजी केली ती हास्यास्पद होती. आता पत्रकार परिषदही गर्दी जमवून करण्याची पद्धत सुरू झाली, तर प्रत्येक पक्ष असा ड्रामा करील आणि त्याचा पोलीस यंत्रणेवर ताण येईल. उद्धव ठाकरे सांगत आहेत की अजूनही कोरोना गेलेला नाही, लोकांनी सोशल डिस्टन्सिंग पाळायला हवे. मग काल तुमच्या लोकांनी पत्रकार परिषदेच्या निमित्ताने जी गर्दी केली होती सोशल डिस्टन्सिंगचे नियम पायदळी तुडवला. त्यांच्यावर कारवाई कोण करणार? म्हणजे नियम फक्त सामान्य जनतेसाठी आहेत का? याचे उत्तर मुख्यमंत्री साहेबांनी द्यावी म्हणजे राजकीय पक्षांनी संभा, मेळावे, पत्रकार परिषदा, पोरा-बाळांची लग्न करू यासाठी गर्दी जमली तर चालेल, पण सामान्य माणसाच्या मैताला चार खांदेकरी जमले तर सोशल डिस्टन्सिंगचे नियम मोडतो. जमलेल्या लोकांमुळे कोरोना पसरतो हा कुठला कायदा? लोकशाहीत कायदा सगळ्यांसाठी सारखा आहे, पण तो फक्त कागदावर, इतर वेळी राजकीय पक्षांच्या पुढारी लोकांसाठी वेगळे कायदे आणि जनतेसाठी वेगळे कायदे यालाच लोकशाही म्हणायचे का?

# खंडणीचा नवीन मार्ग : सेक्स्टॉर्शन

**(दिवसेंदिवस सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे. त्यात सेक्स्टॉर्शनचे प्रमाणही वाढले आहे. लैंगिकतेचा वापर करून लोकांकडून खंडणी उकळण्याच्या प्रकरांमध्ये ४० टक्क्याची वाढ झाली आहे. अशा प्रकारच्या घटना समाजात भीतीचे, नैराश्याचे वातावरण पसरवत आहेत. या धोक्यांपासून कसे सावध राहावे हे या लेखातून जाणून घेऊया.)**

पुणे शहरात नुकतीच एक सेक्स्टॉर्शनची घटना घडली. पुण्यातील एका महाविद्यालतील प्रोफेसरच्या व्हॉट्सअ‍ॅपवर रात्री उशीरा एक मेसेज आला. त्यांच्या एका विद्यार्थिनीची आई बोलत असल्याचे भासवले गेले. तुमचे उद्याचे कॉलेजचे वेळापत्रक काय आहे? असे त्या बाई विचारत होत्या. माझी मुलगी काही मला नीट सांगत नाही, तुम्हीच काय ते सांगा असे त्या म्हणाल्या. काही वेळाने त्याच नंबरवरुन प्रोफेसरला व्हॉट्सअ‍ॅप कॉल आला त्या कॉलवर आवाज व्यवस्थित येत नव्हता, नंतर त्या बाईंनी व्हिडीओ कॉल केला. ज्यात ती महिला काहितरी बोलली आणि मग प्रोफेसरसमोर आपले कपडे काढू लागली. हा व्हिडीओ रेकॉर्ड करुन एडीट केला गेला आणि नंतर तो शिक्षकांच्या ग्रुपवर पाठवण्यात आला आणि काही वेळात डिलीट करण्यात आला. एडीट केलेल्या व्हिडीओमध्ये लिहिले होते की प्रोफेसरच्या मागण्या मान्य करुन घेण्यासाठी विद्यार्थ्यांना काय करावे लागते पाहा. त्या प्रोफेसरने सायबरमध्ये तक्रार केली. सायबर तज्ज्ञांशी हा प्रकार कोणी केला याचा शोध घेतला, तेव्हा त्यांच्याच महाविद्यालयाच्या काही विद्यार्थ्यांनी इंटरनेटवरुन माहिती घेऊन हे सर्व केल्याचे समोर आले. अशा सेक्स्टॉर्शनच्या घटना मुंबई, पुणे, दिल्ली यांसारख्या शहरांसह देशभरात वाढत आहेत.



### सेक्स्टॉर्शन म्हणजे?

एखाद्या गोष्टीवरुन धमकी देऊन खंडणीची मागणी करणे किंवा वसुल करणे म्हणजे एक्स्टॉर्शन होय. मात्र ही धमकी लैंगिकतेशी निगडीत असेल तर त्याला सेक्स्टॉर्शन असे म्हणतात. म्हणजेच, सेक्स अधिक एक्स्टॉर्शन मिळून सेक्स्टॉर्शन हा शब्द बनवला गेला आहे.

भारतात सायबर गुन्ह्यांमध्ये १०० टक्क्यांनी वाढ झालेली आहे. यात साधारणत: ४० टक्के गुन्हे सेक्स्टॉर्शनचे आहेत. ही आकडेवारी केवळ ज्यांनी तक्रार केली त्यांची आहे, परंतु बदनामी किंवा भितीपोटी तक्रार न करणाऱ्यांची संख्याही अधिक असण्याची शक्यता सायबर पोलीस व्यक्त करतात. या प्रकारांमुळे निर्दोष व्यक्तीला कधी आर्थिक भुर्दड भोगावा लागतो तर कधी सामाजिक लज्जेमुळे नैराश्य येते. नेटफ्लिक्सवरील जमतारा वेबसिरीजप्रमाणे सॉफ्ट टारगेट शोधून लोकांना आर्थिक गंडा घातला जातो.

### जनजागृती आवश्यक

गेल्या काही वर्षात सेक्स्टॉर्शनची संख्या वाढत आहे. एखाद्या व्यक्तीशी फेसबुकवरुन मैत्री केली जाते. त्यानंतर न्यूड फोटो पाठवले जातात व्हिडीओ कॉलवर न्यूड होण्यासाठी सांगितले जाते आणि नंतर बदनाम करण्याची धमकी देऊन पैसे उकळले जातात. फसवणूक करणारे लोक फसवल्या गेलेल्या व्यक्तीच्या प्रोफाईलचा संपूर्ण अभ्यास करतात. त्यांच्या फ्रेंडलिस्टमध्ये कोण आहे, ही व्यक्ती काय करते वगैरे ही सगळी माहिती ते घेतात.

सेक्स्टॉर्शनमध्ये फसवणूक झालेल्यांमध्ये पुरुषांची संख्या अधिक आहे. अशी फसवणूक ही मुख्यत्वे राजस्थान, पश्चिम बंगाल, दिल्ली या भागांमधून करण्यात येत असल्याचे प्रमाण अधिक आहे. फसवणूक करणाऱ्या व्यक्ती सऱ्हाईत चोर नसतात. ते एक सिम कार्ड वापरून लगेच फेकून देतात, त्यामुळे त्यांचा माग काढणे कठीण असते. तरी यांना घाबरून ज्यांनी पैसे दिले, त्या व्यक्ती पुढे आल्या तर यांचा तपास करणे सोपे होईल. पैसे कोणत्या अकाऊंटमध्ये टाकले त्यावरुन त्यांचा शोध लावण्यात मदत होईल अशांना चांगलाच चाप लागेल. मात्र लोक कधीच पुढे येत नाहीत. सामाजिक प्रतिष्ठा, पापभीरू वृत्ती यामुळे अशा प्रकरणांविषयी फार बोलले जात नाही. मात्र हा विषय गंभीर आहे. यावर जनजागृती होणे आवश्यक आहे.

### अशी होते फसवणूक!

लोक टेलिग्राम, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअ‍ॅपवर बिझनेस ग्रुप किंवा चॅनेल सुरु करतात. अनेकदा अशा ग्रुपची लिंक ओपन टू ऑल असते. यावर अनेकदा बाहेरच्या देशाचे नंबर देखील अ‍ॅड होतात. ते बिझनेस प्रपोझल पाठवतात. नंतर याची खात्री करण्यासाठी आपण व्हिडीओ कॉल करु असे सांगतले जाते आणि व्हिडीओ कॉल घेतल्यानंतर समोरची व्यक्ती नग्न असते. हा कॉल रेकॉर्ड केला जातो. नंतर तुम्ही बिझनेसच्या नावाखाली असे करायला सांगितले असे म्हणत तो व्हीडिओ ग्रुपवर टाकण्याची धमकी देऊन पैशांची मागणी केली जाते. अशा प्रकारची फसवणुकीची प्रकरणे वर्षभरापासून वाढली आहेत.

सेक्सटॉर्शन, हनीट्रॅपच्या केसेसमध्ये अनेकदा समोर आले आहे की व्हिडीओमधील समोरची न्यूड व्यक्ती खरी नसते. एखादा व्हिडीओ प्ले करुन तो मोबाईल कॅमेराच्या इतक्या जवळ धरला जातो की तुम्हाला ते खरे असल्याचा भास होतो. साधारण ८० टक्के केसेसमध्ये व्हिडीओ प्ले केलेला असतो. प्रत्यक्षात काहीच घडलेले नसते.

### काय काळजी घ्याल?

दिवसभरात आपल्याला शेकडो मेसेजेस व्हॉट्सअ‍ॅप, फेसबुकवर येत असतात. अनेक अनोळखी लोकांच्या फ्रेंण्ड रिक्वेस्ट सुद्धा आलेल्या असतात. त्यामुळे आपली फसवणूक टाळण्यासाठी सोशल मीडियावर वावरताना काही गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे. अनोळखी व्यक्तीशी व्हीडिओ कॉलवरुन संपर्क करताना सुरुवातीला तुमचा चेहरा न दाखवता आधी खात्री करुन घ्यायला हवी. किंवा कॅमेरा सुरुवातीला बंद ठेवून आधी त्या व्यक्तीबद्दल खात्री करायला हवी आणि मग व्हिडीओ ऑन करायला हवा. ज्या वेगवेगळ्या प्रकारच्या लिंक येतात त्यामध्ये कुठल्या प्रकाराचा व्हायरस नाही ना हे तपासले पाहिजे. तुम्हाला एखाद्या अनोळख्या व्यक्तीकडून फेसबुकवरुन फ्रेण्ड रिक्वेस्ट आली असेल तर त्या व्यक्तीचं युआरएल आणि नाव सारखे आहे का ते तपासावे. फेसबूक सिक्युरीटी वीक असलेल्या व्यक्तींना खूपदा टार्गेट केले जाते. त्यामुळे फेसबूक अकाऊंट सर्व सुरक्षा पातळ्यांवर सुरक्षित करून ठेवावे. नोळखी फ्रेण्ड रिक्वेस्ट आली तर ती खात्री करुन स्विकारा किंवा ती स्विकारण्याचे टाळा. अनोळखी नंबरवरुन मेसेज आला तर त्याची खातरजमा करुनच त्यावर रिप्लाय करा. अनोळखी नंबरवरुन व्हिडीओ कॉल आला तर तो स्विकारु नका. सेक्सटॉर्शनच्या केसेसमध्ये फसवणुक करणाऱ्याने असे व्हिडीओ कुठे पोस्ट केल्याचे फारसे दिसून येत नाही. केवळ पैसे उकळण्यासाठी धमकावले जाते. त्यामुळे अशी फसवणुक झाली तर सायबर पोलीस स्टेशनला तक्रार करा.

# बिबट्याला भारी, जानवळ कुत्र्याची जात न्यारी!

मांजरा आणि तावरजा नदीचे खोरे वगळता लातूर जिल्हा काळ्या बेसाल्टवर बसलेला असल्यामुळे प्राचीन काळापासून हा कुरनाळ प्रदेशात मोडणारा... त्यामुळे गुरं पाळण्याचा प्राचीन व्यवसाय इथं अस्तित्वात होता. गुरं पाळणाऱ्या गुराख्याला त्या काळी सर्वात मोठी जोखीम होती ती शिकार करणाऱ्या प्राण्यांची... आजच्या चाकूर तालुक्यातील वडवळ, जानवळ ही गावे बालाघाट पठारावरील डोंगरांनी व्यापलेली असल्याने इथे पाळीव प्राण्यांची वाघाकडून मोठ्या प्रमाणात शिकार होत. त्यामुळे त्यांच्याकडे पूर्वीपासूनच कुत्रे होती. मग प्रश्न पडतो, 'पश्मी' आणि 'कारवान' या आंतरराष्ट्रीय स्तरावरल्या कुत्र्याच्या जाती जानवळ मध्ये कशा आल्या, सर्व सामान्यांप्रमाणे या गावात गेल्यास मलाही तोच प्रश्न पडला... गावातल्या लोकांनी काही हिंट दिल्या. मग माझा शोध सुरु झाला... शोधताना अनेक दुवे हाताला लागले.





### पश्मी कुत्रे आले कुठून

मुघलांनी अफगाणिस्तान मधून २० हजार सैन्य भाडे करारावर भारतात आणले. त्यात मुख्यतः रोहिला आणि पठाण होते. यातले रोहिला हे पश्तून वंशाचे, १८५७ ते १९४७ या काळात ते विविध भागात स्थिर झाले... त्यांचे काही गट दिल्ली, गुरगाव येथे तर काही गट दख्खनच्या पठारावर आले. जानवळ भागात मोठ्या प्रमाणात तंडे होते. ते आजही आहेत, त्यात अनेक निर्वासित यायचे.. येथे रोहिले नांदले की नाही याच्या नोंदीकुठे सापडत नाहीत, मात्र नांदेड, किनवट, वाशिम मध्ये असल्याचे उल्लेख आहेत. १९४७ ला देश स्वातंत्र झाला, सगळे स्थिरस्थावर झाल्यानंतर हे निर्वासितांचे तांडे हालले. जानवळकरानी पश्तून लोकांकडील कुत्र्यांचे ब्रीड जोपासले आणि वाढविले त्याला नाव पडले पश्मी... ह्या कुत्र्याच्या जातीत जन्मलेल पिलू दोन रंग घेऊन जन्मते... काळा पांढरा, लाल पांढरा पण याचे पुढे जे जानवळ ब्रीड झाले ते मात्र फक्त सिंगल कलरचे झाले... यांची उंची साधारण २८ इंच आणि लांबी ३० इंच असते. मूळ ब्रीड किरघीस्थानचे असल्यामुळे उन्हापासून संरक्षण म्हणून चक्क सिंहासारखे केस यांच्या अंगावर असायचे, आता ते बरेच कमी झाले आहेत. हे कुत्रे अत्यंत रुबाबदार धिप्पाड राखणदारीसाठी उपयोगाला आणली जात... आज जानवळ गावात जवळपास १५ घरात या कुत्र्यांचे वंश वाढविले जात आहे. जन्मल्या पासून आईचे दूध तुटे पर्यंत ही कुत्र्याची पिल्लं विकली तरी दिली जात नाहीत. एका पिलाची किंमत १५ हजार रुपये आहे. या गावात याची लाखात उलाढाल आहे.

### कारवान कुत्रे कुठून आले

गावातले लोक सांगतात हे तांड्याच्या कारवां बरोबर आले म्हणून त्याचे नाव कारवान पडले. पण याचा शोध घेतला असता वेगळे संदर्भ भेटले, अमेरिकेत कैरावान हाउंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जातीचे हे कुत्रे असून भारतात कर्नाटक राज्यात मुधोळचे राजे घोरपडे यांनी हा वंश भारतात आणला म्हणून याला मुधोळ हाउंड म्हणून ओळखल्या जाते. पण जानवळ येथे ह्या कुत्र्याच्या ब्रीडला बांगडी कारवान हे नाव पडले. जगभर अत्यंत चपळ कुत्रे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जर्मन शेफर्ड पेक्षा या कारवान कुत्र्यांचा पळण्याचा वेग दुप्पट आहे. हे खुंखार शिकारी कुत्रे म्हणून ओळखलेले जातात. हे सगळे वैशिष्ट्य असलेल्या या मुधोळ हाउंडला २०१७ पासून भारतीय सैन्य दलातही घेतले आहे.

### कारवान शिकारी कुत्रे

जानवळच्या कारवान कुत्र्याचे तोंड अत्यंत निमुळते असल्यामुळे जबडयाची ताकत प्रचंड आहे. तोंड एवढे निमुळते आहे की बायका घालतात ती बांगडी त्याच्या डोळ्याच्या वर पर्यंत जात असल्यामुळे त्याला बांगडी कारवान म्हणतात... या गावचे रहिवाशी असलेले मागच्या अनेक पिढ्यानीं कारवान ब्रीडची जपणूक केलेले तानाजी पवार यांच्या घरात एक अनोखा कुत्र्याच्या गळ्यात घालायचा पट्टा दाखवला त्यावरून हे सिद्ध झालं की कारवान बिबटयाची शिकार करायचे...बिबटया किंवा वाघ शिकार करतांना अगोदर मान पकडतात म्हणून मानेत जे पट्टा घातला जायचा त्यापट्याला अत्यंत तीक्ष्ण लोखंडी खिळे मारले जायचे त्यामुळे बिबट्या मान धरायला गेला तर तो त्या तीक्ष्ण खिळ्यांनी जायबंदी व्हायचा आणि त्याच्यावर कारवान कुत्रे वरचढ व्हायचे. अशी माहिती तानाजी पवार यांनी दिली आणि त्या पट्याचे फोटोही उपलब्ध करून दिले.

### पोटात असतानाच पिल्ले होतात बुक

जानवळ ब्रीडचा डंका देशभर पोहचला असून लांबून लांबून लोक या कुत्र्यांच्या पिल्लासाठी येतात. साधारण १५ हजार रुपयापर्यंत एक पिल्लू विकलं जातं...पिल्लू बुक केलं तरी आईचे दूध तुटे पर्यंत हे पिल्ल तुमच्या हाती दिली जात नाहीत... बाहेरचे दूध प्यायला लागल्यानंतरचं कुत्रे ताब्यात दिले जाते. जानवळ मधल्या अनेक लोकांचा हा व्यवसाय झाला असून यातून उत्तम उत्पन्नही त्यांना मिळत आहे.

**– युवराज पाटील, जिल्हा माहिती अधिकारी, लातूर**

# बनावट आधारकार्डाच्या आधारे सिमकार्ड विक्री करणारी टोळी गजाआड

**भिवंड/प्रतिनिधी**

बनावट आधार कार्डाचा वापर करून शेकडो सिम कार्ड विक्री करणाऱ्या दुकलीस भिवंडीतील भोईवाडा पोलिसांनी अटक केली. या गुन्ह्यात एका अल्पवयीन मुलाचा सहभाग असल्याने त्यालासुद्धा ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्या ताब्यातून विविध कंपन्यांचे सुमारे ३८८ सिम कार्ड जप्त करीत २ लाख २३ हजार १६२ रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतल्याची माहिती भिवंडी पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण, एसीपी सुनील वडके यांनी पत्रकार परिषदेत दिली. भिवंडी न्यायालयाने २७ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. भिवंडी शहरातील धामणकर नाका व त्यानंतर नागाव गायत्री नगर रोड या दोन ठिकाणी बनावट कागदपत्रांच्या आधारे सिम कार्ड विक्री केली जात असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक शंकर इंदलकर यांना मिळाली होती. त्यांनी ही बाब पोलिस उपायुक्त योगेश चव्हाण यांना दिली. पोलिसांनी विशेष तपास पोलिस पथक निर्माण करून चौकशीअंती सईद अब्दुल गफार शेख (वय २४), मो. इरफान अन्सारी (वय २३) व एक विधिसंघर्षग्रस्त बालक (सर्व रा. नागाव, फातमा नगर, भिवंडी) या तिघांना ताब्यात घेतले. गेल्या काही दिवसांत चोरीला गेलेले आणि गहाळ झालेले वेगवेगळ्या कंपन्यांचे तब्बल १०० मोबाईल फोन जप्त करण्याबरोबरच दोन गुन्हे उघडकीस आणण्यात ठाणे गुन्हे शाखेला यश आले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

21 TO 27 FEBRUARY 2022 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 19/02/2022 9:42 PM Page 1



# महाराष्ट्र तांदूळ महोत्सवाचे उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन



**मुंबई/प्रतिनिधी**

शेतकरी ते थेट ग्राहक या संकल्पनेतून महाराष्ट्र तांदूळ महोत्सव' आयोजित करण्यात आला असून या महोत्सवाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे सुरु असलेल्या या महोत्सवाच्या उद्घाटनाप्रसंगी सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील, खासदार सुप्रिया सुळे, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार, कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले व मान्यवर उपस्थित होते. राज्यातील विविध भागात वेगवेगळ्या प्रकारचा तांदूळ, गहू, हळद आणि गावरान कडधान्य, डाळी, असे पीक शेतकरी बांधव घेत असतात. या उत्पादनाला मोठी बाजारपेठ उपलब्ध व्हावी आणि शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा तसेच ग्राहकांना योग्य दरात चांगल्या दर्जाचे धान्य उपलब्ध व्हावे यासाठी शेतकरी ते थेट ग्राहक या संकल्पनेतून हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात सहभागी झालेल्या सर्व तांदूळ उत्पादकांशी उपमुख्यमंत्री श्री. पवार आणि सहकार मंत्री श्री. पाटील यांनी संवाद साधला. प्रत्येक स्टॉलवरील तांदळाची वैशिष्ट्ये जाणून घेतली. राज्याचे समृद्ध असे कृषी वैविध्य एकाच ठिकाणी पहायला मिळत असल्याबद्दलही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी समाधान व्यक्त केले. यशवंतराव चव्हाण सेंटर आणि श्री स्वामी समर्थ शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड व ग्रोवर्स डायरेक्ट इंडिया लिमिटेड यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेला 'महाराष्ट्र तांदूळ महोत्सव' गुरुवार दि. १७ ते १९ फेब्रुवारी २०२२ असे तीन दिवस असणार आहे. यामध्ये सेंद्रिय निळाभात, काळाभात, लाल तांदूळ (शुगर फ्री) इंद्रायणी, काळातांदूळ, कोलम, वाडा कोलम, झिनी कोलम, ब्राउन राईस, आंबेमोहोर, रायभोग, काळा गहू, नाचणी, सेंद्रिय काजू, महिला बचत गटांकडून तयार करण्यात येणारी उत्पादने यांचा समावेश आहे. नागरिकांनी या महोत्सवाला भेट देऊन लाभ घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले.

# भिवंडीत केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या शुभहस्ते तब्बल ८१ कामांचा लोकार्पण आणि भूमिपूजन संपन्न

**भिवंडी/आकाश गायकवाड**

केंद्रीय पंचायत राज राज्य मंत्री कपिल पाटील यांच्या भिवंडी तालुक्यातील हायवे दिवे या गावासह पंचक्रोशीतील अंजुर अलीमघर, वेहळे, पिंपळनेर, सुरई या गावात जिल्हापरिषद सदस्य देवेश पाटील यांच्या पुढाकाराने मंजूर झालेल्या विविध विकासकामांसह कपिल पाटील फाऊंडेशन व डी मार्ट ई लर्निंग सेंटरच्या माध्यमातून तब्बल पाच जिल्हा परिषद शाळांमध्ये सुरू करण्यात आलेल्या ई क्लास रुम, वाचनालय, ई लायब्ररी यांचा शुभारंभ केंद्रीय पंचायत राज राज्य मंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते करण्यात आला तर गावातील रस्ते, गटार पाथवेज पथदिवे सुशोभीकरण अशा विविध कामांचा भूमिपूजन सुद्धा केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले.



ग्रामपंचायत हे स्थानिक स्वराज्य संस्थेचे मूळ असून या ग्रामपंचायत क्षेत्रात अनेक काम थेट केंद्र सरकारच्या निधीच्या माध्यमातून होत असतात. परंतु त्याचे श्रेय कधीच केंद्र सरकारला दिले जात नाही. १४व्या व १५व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून देशातील २ लाख ६९ हजार ग्रामपंचायती मध्ये काम करण्यासाठी केंद्र सरकारच्या पंचायतराज मंत्रालयाच्या माध्यमातून २ लाख ३६ हजार कोटी निधी खर्च होणार असल्याने भविष्यात देशातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये एकाच वेळी कामाचा शुभारंभ ऑनलाईन च्या माध्यमातून देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते घडवून आणणार असून प्रत्येक ग्रामपंचायतीच्या पाटीवर प्रधानमंत्री यांचे नाव झळकविण्याचा मनोदय केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी बोलून दाखविला आहे.

# ज्ञानदीप स्पर्धा परिक्षा केंद्राचे यश



**अहमदपूर/फिरोज शेख**

स्पर्श द इम्फाटिक टच सेवाभावी संस्था अंतर्गत ज्ञानदीप स्पर्धा परिक्षा केंद्र अहमदपूर येथील विद्यार्थी ज्ञानेश्र्वर घूगे यांने प्रथम क्रमांक तर मचिंद्र चौरे या विध्यार्थ्याने तृतीय क्रमांक पटकावला सार्वजनिक छत्रपती शिवजयंती महोत्सव समिती २०२२ अहमदपूर तर्फे मॅरेथॉन स्पर्धचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेचे उद्घाटन शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त श्री गणपतराव (तात्या) माने यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपस्थित सहाय्यक पोलिस निरीक्षक रामचंद्र केदार, पोलीस उपनिरीक्षक पल्लेवाड, डॉ.अनिल मुंडे, ज्ञानदीप अकॅडमी अहमदपूर चे संचालक उद्धव इप्पर, डॉ जायभाये, तळेगाव चे सरपंच ज्ञानेश्वर शेळके, प्रा.दत्ता गलाले, प्रा. विनोद माने, प्रा. प्रशांतजी माने, प्रा. संतोषजी कदम, प्रा. मनोज रेड्डी, छत्रपती महोत्सव समिती चे अध्यक्ष सुदर्शन लहुजी पाटील उपाध्यक्ष संग्राम पवार, सचिव आकाश माने, सहसचिव रोहीत पाटील, कोषाध्यक्ष आदिनाथ पाटील, कार्याध्यक्ष नागेश वरवटे व सर्व शिवभक्त उपस्थित होते. त्यावेळी छत्रपती महोत्सव समितीच्या वतीने दोन्ही यशस्वी विध्यार्थ्याचा सन्माम करण्यात आला यावेळी सर्व विध्यार्थी उपस्थीत होते.

# स्वयं प्रकाशित होण्यासाठी शीलाचे आचरण महत्त्वाचे आहे -भिक्खू गोविन्दो

**लातूर/प्रतिनिधी**

संपूर्ण विश्वाला २६०० वर्षापूर्वी तथागत भगवान गौतम बुध्दांनी अत्त दीप भव या स्व विकासाच्या सम्यक मार्गाची शिकवण दिली आहे. त्यामुळे अत्त दीप भव या संदेशाप्रमाणे प्रत्येकाला स्वयं प्रकाशित होण्याकरीता शीलाचे आचरण करणे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन बुध्द सृष्टी धम्म केंद्र, कळंब जि.बीड येथील पूज्य भिक्खू गोविन्दो यांनी केले. बौध्द धम्म संस्कार प्रशिक्षण चरिटेबल ट्रस्टच्यावतीने महाविहार, धम्म केंद्र, सातकर्णी नगर, बार्शी रोड, रामेगाव ता.जि.लातूर येथे माघ पौर्णिमेच्या निमित्तानं धम्मदेशना व सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पूज्य भिक्खू गोविन्दो धम्मदेशना देताना बोलत होते.



यावेळी विचारपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूरचे उपअभियंता इंजि. संजय सावंत, मी रिपब्लिकनचे महेंद्र निकाळजे (अंबाजोगाई), प्रा.यु.डी.गायकवाड, अड.अतिश चिकटे, कनिष्क टि.एम.कांबळे, पंकज काटे, धम्मचारी विरतकुमार, अक्षय धावारे, कुणाल श्रृंगारे आणि डा.सुधाकर गुळवे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात तथागत बुध्द व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पुजा करुन त्रिशरण पंचशिल व वंदनेने करण्यात आली. पुढे धम्मदेशना देताना पूज्य भिक्खू गोविन्दो म्हणाले की, आत्मनिर्भर ही संकल्पना मुळात बुध्दाने अडीच हजार वर्षापूर्वी अत्त दीप भव या पाली वचनातून सांगत मनुष्याला स्वंय प्रकाशित अर्थात विकसित करण्यासाठीचा संदेश दिला आहे. भौतिक साधनांच्या विकासासोबत वैचारिक विकास हे मानवी जीवनाच्या आत्मविकासाचे सुत्र आहे असे सांगून दैनदीन मानवी व्यवहारातील विविध उदाहरनाद्वारे विस्तृतपणाने आपले विचार धम्मदेशनेत उपासकासमोर व्यक्त केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे संयोजक भिक्खू पय्यानंद धम्मदेशना देताना म्हणाले की, वर्तमानकाळात बौध्द धम्म वाढीसाठी बौध्द अनुयायांनी बौध्द धम्माचा अभ्यास, चिंतन व कृतिशील आचरण करणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित सर्व पाहुण्यानी शुभेच्छा व मार्गदर्शनपर विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.दूष्यंत कटारे यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.देवदत्त सावंत यांनी केले आणि आभार डॉ.विजय अजनीकर यांनी मानले. या कार्यक्रमाला वसंत वाघमारे, रमेश श्रृंगारे, मंदाकिनी गोडबोले, शोभा सोनकांबळे, महेश सुरवसे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी भरत कांबळे, सुधाकर कांबळे, अनिरुध्द बनसोडे, उदय सोनवने, पंडीत सुर्यवंशी, डॉ.अरुण कांबळे, पांडुरंग अंबुलगेकर, डॉ.संजय गवई, परमेश्वर आदमाने, राहुल सोनवने, विशाल वाव्हुळे, निलेश बनसोडे आणि बालाजी धायगुडे आदींनी परिश्रम घेतले. भंतेजी आशीर्वादाने कार्यक्रमाची समाप्ती करण्यात आली.

# जलसंवर्धन साक्षरतेच्या जाणीवजागृतीत युवकांची भूमिका महत्वाची -डॉ.संजय गवई

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहराचा परिचय हा सन १९९३ला झालेला किल्लारी येथील प्रलयकारी भूकंप, शैक्षणिक क्षेत्रामधील क्रांतिकारक शहर आणि मागील काही वर्षापासून रेल्वेने आलेले पाणी! या सर्व बाबींमुळे लातूरचा सर्वानाच परिचय आहे. मात्र लातूरला रेल्वेने पाणी आणने ही आपल्यासाठी अत्यंत खेदजनक व लाजिरवाणी बाब आहे. परंतु मागील तीन ते चार वर्षापासून लातूर जिल्ह्यातील शासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक ग्रामस्थ यांच्या सक्रिय आणि सकारात्मक प्रतिसादामुळे आज लातूर जिल्ह्याची भूजल पातळी ही नक्कीच वाढलेली आहे परंतु भविष्यात ही भूजल पातळी आपल्याला टिकून ठेवायची असेल तर जलजागरण आणि जलसंवर्धन साक्षरता करणे गरजेचे आहे यासाठी समाजातील युवक युवतीने पुढाकार घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन नेहरू युवा केंद्र, लातूरचे सल्लागार समिती सदस्य तथा रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.संजय गवई यांनी केले. नेहरू युवा केंद्र संघटन, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, जिल्हा युवा अधिकारी कार्यालय, लातूर आणि ग्रामपंचायत कार्यालय, वलांडी ता.देवणी यांच्या संयुक्त विद्यमाने जलजागरण आणि जलसंवर्धन साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते यावेळी विचारमंचावर सरपंच राणीताई राम भंडारे, उपसरपंच प्रा.मेहमूद सौदागर, प्रमुख अतिथी म्हणून आर्ट ऑफ लिव्हिंगचे शिरीषकुमार जाधव, कोरोना एकल महिला पुनर्वसन समितीचे तालुका समन्वयक तथा वात्सल्य समितीचे सदस्य वरुणराज सूर्यवंशी, नेहरू युवा केंद्राचे देवणी तालुका समन्वयक परमेश्वर बिरादार आणि प्रणव बिरादार यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले हा कार्यक्रम जिल्हा युवा अधिकारी साक्षी समैय्या आणि संजय ममदापूरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. पुढे बोलताना डॉ.संजय गवई म्हणाले की, पाण्याची बचत आपण साध्या साध्या गोष्टीपासून करू शकतो जसे आपल्या घरी व्यक्ती आल्यानंतर त्यांना पूर्ण ग्लास पाणी न देता अर्धा ग्लास देणे, घरातील सांडपाण्यावर परसबाग फुलविणे आणि सातत्याने पाण्याच्या बचतीचा विचार कृतीत उतरवणे या बाबी महत्त्वाच्या असल्याचे ते म्हणाले. या कार्यक्रमांमध्ये शिरीष जाधव यांनी जलसंवर्धनाची, तर वरुणराज सूर्यवंशी यांनी कोरोना एकल महिलांसाठी असलेल्या शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. यावेळी पुंडलिक सोनकवडे परिवारातर्फे सरपंच आणि उपसरपंच यांचा फेटा, शाल व पुष्पगुच्छ देऊन उत्कृष्ट कार्याबद्दल यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच कोरोनामध्ये निधन झालेल्या श्रीमती रंजना कांबळे यांचाही सत्कार करून त्यांच्या दोन मुलांना बालसंगोपन योजनेचा लाभ देण्याची जबाबदारी स्वीकारण्यात आली. यावेळी प्रास्ताविक करताना सरपंच राणीताई भंडारे यांनी वलांडी गावांमधील विविध सामाजिक उपक्रमाची माहिती सर्वांना दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रणव बिरादार यांनी केले तर आभार प्रा.मेहमूद सौदागर यांनी मानले या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शादुल बोडीवाले, ग्रामसेवक विठ्ठल बनसोडे, ग्राम पंचायत सदस्य महेश बंग, प्रभाकर सोनकवडे, सूर्यकांत वाघमारे आणि सुमित भडके यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला वलांडी गावातील युवक युवती, कोरोना एकल महिला व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.



# सोलापूर ग्रामीण पोलीस पाल्यांसाठी मार्गदर्शन शिबिर



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर ग्रामीण पोलीस दलातर्फे गुरुवारी सोलापूर- हैदराबाद रस्त्यावरील मोतीवाला मल्टीपर्पज हॉल येथे पोलीस पाल्यांसाठी मार्गदर्शन शिबीर पार पडले. या शिबिरांमध्ये अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव व पोलीस उपाधीक्षक अमोल भारती यांनी मार्गदर्शन केले. या शिबिरा करिता उपस्थित पोलीस पाल्यांना येत्या २४ फेब्रुवारी रोजी सोलापूर ग्रामीण पोलीस दलातर्फे संपन्न होणाऱ्या पोलीस कल्याण नोकरी मेळाव्याच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यात आले. सदर मार्गदर्शन शिबिरा करता सुमारे १५० पोलीस पाल्य उपस्थित होते. या शिबिरास पोलीस उपअधीक्षक सूर्यकांत पाटील, राखीव पोलीस निरीक्षक आनंद काजुळकर, कामती पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश माने, वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अतुल भोसले, सहाय्यक फौजदार खाजा मुजावर, पोलीस अंमलदार नारायण गोलेकर व इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस उपनिरीक्षक सुबोध जमदाडे यांनी केले. या मेळाव्याच्या आयोजनाकरिता पोलीस उपअधीक्षक सुर्यकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कल्याण शाखा व स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेची सभा संपन्न



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्हा परिषदेत सदरची सभा दिनांक १७ फेब्रुवारी रोजी यशवंतराव चव्हाण सभागृहमध्ये हिरेमनी (राज्य उपाध्यक्ष) महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटना यांच्या अध्यक्षतेखाली व सर्व सभासद व कर्मचारी बंधू-भगिनी यांच्या उपस्थितीत नुतन कार्यकारणी पदाधिकारी यांची निवड करण्यात आली. श्रीशैल देशमुख (जिल्हाप्रमुख), सूर्यकांत गायकवाड (जिल्हाअध्यक्ष), नितीन स्वामी (कार्याध्यक्ष), संजय चव्हाण (जिल्हा सचिव), सुरेश साळुंखे (उप अध्यक्ष), सविता चव्हाण (महिला उप अध्यक्ष), सविता मिसाळ (उप अध्यक्ष), कृष्णा अधटराव (खजिनदार) या सर्व पदाधिकाऱ्यांची बहुमताने निवड करण्यात आली. सदर निवडी दरम्यान तालुक्यातील व जिल्ह्यातील बहुसंख्य कर्मचारी उपस्थित होते. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

# तालुक्यातील डाहे गावात रुग्णवाहिकेचे लोकार्पण



वाडा/प्रतिनिधी

मागील काही दिवसांपासून ग्रामीण भागात रुग्णवाहिका नसल्याने रुग्णाचे हाल होत आहेत याची जाणीव राखत मशाल सामाजिक संस्था व शिवसेनेच्या वतीने डाहे विभागातील नागरिकांसाठी मोफत रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली आहे. रविवारी (दि.१३) शिवसेनेचे माजी आमदार पांडुरंग बरोरा यांच्या हस्ते श्रीफळ वाहून रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले. या प्रसंगी ठाणे जिल्हा (ग्रा.) प्रमुख प्रकाश पाटील यांच्यासह पत्रकार शरद पाटील, सामाजिक कार्यकर्ते कमलाकर पाटील, वाडा पंचायत समितीचे उपसभापती, माजी सभापती, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष निलेश गंधे, प्रकाश केणे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# महानंदा मुरगे यांना पीएच.डी. प्रदान



**औसा/प्रतिनिधी**

येथील श्रीमती महानंदा उमाकांतअप्पा मुरगे उर्फ सौ. मेघना नरेश हालके औसा यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या वतीने नुकतीच भूगोल विषयात पीएच.डी. ही पदवी प्रदान करण्यात आली. विवाहानंतरही शिक्षण घेण्याची जिद्द न सोडता बीड जिल्ह्यातील नागरी केंद्रांचा अभ्यास या विषयावर डॉ एस. बी. आष्टुरे (भूगोल विभागप्रमुख श्री कुमारस्वामी महाविद्यालय, औसा) यांच्या मार्गदर्शनाखाली शोधप्रबंध सादर करून पीएच. डी. पदवी मिळवली. या यशाबद्दल विरशैव समाजाचे शांतविरलिंग शिवाचार्य महाराज, महंतस्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सद्गुरू गहिनीनाथ महाराज, वीरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष सुभाषप्पा मुक्ता, उपाध्यक्ष वैजनाथप्पा इळेकर, राविअप्पा राचोटी, प्रा. नरेश हालके, प्राचार्य महेश्र्वर बेटकर, प्राचार्य डॉ नरेंद्र माळी, प्राचार्य डॉ हरिदास राठोड, प्रा. डॉ सुरेश फुले, प्रा. डॉ. ओमप्रकाश शहापुरकर, प्राचार्य सदानंद गोने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.मंजुनाथ मानकरी, डॉ काळगापुरे, डॉ दिलीप भोंगे, डॉ पांडुरंग आचोले डॉ गोडबोले, डॉ विरभद्र दंडे, डॉ संगमेश्र्वर धारशिवें, प्रा. अविनाश कदम यांनी अभिनंदन करून कौतूक केले.

# तालुक्यातील कुडूस येथे रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघात होऊन तरुण जखमी



वाडा: तालुक्यातील कुडूस येथील कोकाकोला कंपनी समोर असलेल्या खड्ड्याचा अंदाज आला नसल्याने प्रशांत यादव याची स्कुटी खड्ड्यात आदळली व झालेल्या अपघातात प्रशांतच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. दरम्यान सामाजिक कार्यकर्ते रुकसाद शेख व प्रितेश पटेल यांनी प्रशांत यास तात्काळ कुडूस येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर त्याला अंबाडी येथील खाजगी रुग्णालयात अधिक उपचारासाठी दाखल करण्यात आले असून सध्या त्याची प्रकृती स्थिर असल्याचे समजले.

21 TO 27 FEBRUARY 2022 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 19/02/2022 9:42 PM Page 1



# वालीव पोलिसांकडून रिक्षा चोरणाऱ्या टोळीला अटक



**वसई/प्रतिनिधी**

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील वालीव काशिमीरा आणि वर्तक नगर या तीन पोलीस ठाण्यांच्या क्षेत्रात रिक्शा चोरणाऱ्या एका टोळीला पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडून १० चोरीच्या रिक्षा तसेच ११ डिस्क सहित टायर २ ऑटो रिक्षाच्या बॅटरी आदी ५,०८,०५० रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वसईच्या गावराईपाडा येथे राहणारा हरिकिशन विक्रम पाल यांची बजाज कंपनीची एम.इह.४७ डी ३५४२ क्रमांकाची रिक्षा चोरीला गेली होती. या प्रकरणी त्यांनी वालीव पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली होती. वालीव पोलिसांनी गु.र.क्रमांक १२४७/२०२१ कलम ३७१ अन्वये गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी तपास सुरु केला असता खास खबरीने दिलेल्या माहिती वरून सोनू अभिमन्यू पांडे (२४, रा. मुंबई -अहमदाबाद हायवे जवळ चिंचोटी), प्रवेशकुमार चंद्रशेखर शुक्ला (२८, रा. लोहारपाढा वसई आणि संजय कुमार रामाचाल गौतम (२४, रा. चिंचोटी वसई) यांना अटक करून त्यांची चौकशी केली असता त्यांनी १० गुन्ह्यांची कबुली दिली. त्यात वालीव पोलीस ठाण्यातील ७, काशिमिरा मधील १ आणि वर्तक नगर मधील २ गुन्ह्यांचा समावेश आहे. आता पोलीस त्यांच्या इतर साथीदारांचा शोध घेत आहेत.

सदर कारवाई पोलीस उपयुक्त डॉ. महेश पाटील, सहपो आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखा २ वसई युनिटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनि रणजितसिंग परदेशी, सपोनि सुहास कांबळे, सपोनि ज्ञानेश्वर जगताप, पो.हवा. मंगेश चव्हाण, रमेश भोसले, संजय नवले, महेश पागधरे, चंदन मोरे, सचिन पाटील, प्रशांतकुमार ठाकूर, प्रशांत पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, अमोल कोरे, दादा आडके, सुधीर नरळे यांनी भाग घेतला.

# पोलिसांनी विरोधात तक्रार दाखल करुन घेतल्याने पोलीस अधिकाऱ्याची कॉलर पकडणाऱ्या मायलेकास केली अटक

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरात पोलिस आपला वचक राखण्यात कमी पडत असल्याने मागील काही दिवसात भिवंडी शहरात पोलिसांवर हात उगारण्याचे प्रकार वाढीस लागले असून त्यातच थेट पोलीस ठाण्यात अधिकारी कर्मचारी यांच्या वर हात उगारून मारहाण केल्याचा प्रकार घडत आहेत. नुकताच एका महिलेसह तिच्या मुलाने नारपोली पोलीस ठाण्यात ठाणे अंमलदार म्हणून कर्तव्यावर असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत आबाराव आवारे यांना मारहाण केल्याचा गुन्हा घडला आहे. या प्रकरणी पुजादेवी अभिलाष कनोजीया, वय ४० व अनुप अभिलाष कनोजिया वय २६ दोघे रा. काल्हेर या दोघा मायलेकांना ताब्यात



घेण्यात आले आहे.

या बाबत महिती अशी की पुजादेवी व तिचा मुलगा अनुप हे दोघे त्यांच्या २० वर्षीय मुलीस कोणत्या न कोणत्या क्षुल्लक कारणांवरून नेहमी मारहाण करीत असल्याने त्रासलेल्या मुलीने आपल्या आईसह भावा विरोधात तक्रार दिल्याने पोलिसांनी आई व भाऊ यांना पोलीस ठाण्यात बोलावले असता त्याचा राग येऊन पुजादेवी यांनी पोलीस ठाण्यात येत तुम्ही माझ्या मुलीची तकार माझ्या विरोधात कशी काय घेतली? माझा माझ्या मुलीवर अधिकार असुन मी माझ्या मुलीला मारहाण करू शकत नाही का? असे मोठमोठया बोलून, पोलीस ठाण्यात आरडाओरडा करीत दोघांनीही प्रशांत आवारे यांच्या कानशिलात मारून त्यांच्या गालावर हाताची नखे जोराने ओरखडुन सरकारी गणवेशाची कॉलर पकडुन जोराने खेचुन दुखापत केली. या प्रकरणी त्यांनी तक्रार दिल्याने या दोघा मायलेका विरोधात भादवि कलम ३५३,५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून आरोपींना नोटीस बजावून सायंकाळी अटक केली आहे.

# इरोटरी क्लबतर्फे पाच शाळांमध्ये मुलींसाठी शिवणकाम प्रशिक्षण व स्वच्छता गृहाचे उद्घाटन



**वाडा/प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ बॉम्बे पिअर मार्फत स्वजन गार्डी विद्यालय, खैरे आंबिवली, माध्यमिक विद्यालय, आबिटघर, माध्यमिक विद्यालय, तुसे, न्यू इंग्लिश स्कूल, सोनाळे आणि स्वामी विवेकानंद विद्यामंदिर वाडा या पाच शाळांमध्ये प्रत्येकी पाच अशा एकूण २५ शिवणयंत्र देण्यात आले. तसेच मोफत प्रशिक्षण देण्यासाठी दोन शिक्षिकांची वर्षभरासाठी नेमणूक करण्यात आली. रोटरी क्लब ऑफ बॉम्बे पिअरचे माजी अध्यक्ष आशिष शहा उपक्रमाबद्दल अधिक माहिती देताना म्हणाले की पाठ्यक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यामधील कौशल्य विकास व्हावा, त्यांनी स्वयंरोजगारासाठी तयार रहावे. विशेषतः विद्यार्थीनींनी आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनावे यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला आहे. याप्रसंगी खैरे आंबिवली येथील शाळेमध्ये मुलांसाठी अद्यावत प्रसाधनगृह आणि तुसे येथील शाळेमध्ये हँडवॉश स्टेशनचे देखील उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून रोटरी क्लब ऑफ बॉम्बे पिअरचे माजी अध्यक्ष आशिष शहा, करिश्मा शहा, जिल्हा परिषद सदस्या भक्ती वलटे, पंचायत समिती वाडाचे उपसभापती अमोल पाटील, वाडा पंचायत समिति सदस्य सागर ठाकरे, रोटरी क्लब ऑफ वाडाचे सदस्य शशांक ठाकरे, समीर गव्हाळे, राकेश ठाकरे, प्रफुल्ल बोकंद, सावनी गव्हाळे, शाळांचे मुख्याध्यापक, शाळा-संस्थेंचे पदाधिकारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# छत्रपती शिवरायांचे विचार आत्मसात करणे काळाची गरज -रुपेश म्हात्रे

**भिवंडी/प्रतिनिधी**

छत्रपती शिवरायांचा इतिहास व त्यांच्या कर्तृत्वाचा अभ्यास करून शिवरायांचे विचार तरुणांनी प्रत्यक्षात आत्मसात करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन भिवंडी पूर्व चे माजी आमदार रुपेश म्हात्रे यांनी खारबाव ग्रामपंचायतीच्या वतीने उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती अश्वरूढ पुतळ्याच्या उद्घाटन प्रसंगी शनिवारी शिवजयंतीनिमित्त व्यक्त केले.भिवंडी तालुक्यातील खारबाव ग्रामपंचायतीचे सरपंच महेंद्र पाटील यांच्या संकल्पनेतून व व्यावसायिक मयुर म्हात्रे यांच्या माध्यमातून ग्रामपंचायत कार्यालयाच्या समोर छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वरुढ पुतळा उभारण्यात आला आहे. भव्य अशा



पुतळ्याचे अनावरण राज्याचे गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते होणार होते. मात्र काही कारणास्तव उद्घाटन कार्यक्रमाला जितेंद्र आव्हाड अनुपस्थित राहिल्याने माजी आमदार रुपेश म्हात्रे यांनी या पुतळ्याचे अनावरण केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरुढ पुतळ्याचे उद्घाटन व विधीवत पूजा करण्याची संधी मला मिळाली हे माझे भाग्य आहे असे मत यावेळी आमदार माजी आमदार रुपेश म्हात्रे यांनी या कार्यक्रमा प्रसंगी व्यक्त केले. याकार्यक्रमा प्रसंगी समाज कल्याणन्यासचे संस्थापक अध्यक्ष डॉ सोन्या पाटील, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष गणेश गुळवे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ कार्यकर्ते कमलाकर टावरे, ज्येष्ठ नगरसेवक भगवान टावरे यांच्यासह खारबाव ग्रामपंचायतीचे आजी माजी सरपंच , उपसरपंच व सदस्य कमिटी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. खारबाव गावातील बांधकाम व्यावसायिक मयुर म्हात्रे यांनी त्यांच्या आजोबांच्या स्मरणार्थ या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासाठी निधी दिली असल्याने ग्रामपंचायत सरपंच व मान्यवरांनी म्हात्रे परिवाराचे विशेष अभिनंदन केले.

# वसईतील ११ हजार दुहेरी शिधा लाभार्थ्यांची चौकशी होणार

**विरार/प्रतिनिधी**

गोरगरिबांना माफक दारात धान्य उपलब्ध व्हावे यासाठी सरकारने धान्याचे रेशनिंगद्वारे योग्य वितरण सुरु केले होते. मात्र काही लोक याचा दुहेरी फायदा घेत आहेत. म्हणजे त्यांच्या मुळगावी हि त्यांचे रेशनिंग कार्डावर नाव आहे आणि सध्या ते ज्या शहरात कामा धंद्यानिमित राहत आहेत. तिथेही ते रेशनिंग वरील धान्याचा लाभ घेत आहेत. एकट्या वसईमध्ये ११ हजार दुहेरी शिधा लाभार्थी असल्याची माहिती उघडकीस आली आहे. दरम्यान केंद्राने अशा दुहेरी शिधापत्रिका धारक लाभार्थ्यांचा शोध घेण्याचे आदेश सर्व संबंधित शिधा पुरवठा कार्यालयांना दिले आहेत. त्यामुळे अशा दुहेरी लाभार्थ्यांचा शोध सुरु झाला असून यापुढे अशा लाभार्थ्यांना केवळ एकाच ठिकाणी धान्य मिळणार आहे. कारण एकाच व्यक्ती दोन ठिकाणी धान्य घेत असल्याने त्याचा पुरवठा आणि वितरण व्यवस्थेवर परिणाम होत असल्याचे केंद्रीय अन्न व नागरीपुरवठा मंत्रालयाने सांगितले आहे.





# अक्षय इंगोले यांचा वाढदिवस साजरा

**मुंबई/प्रतिनिधी**

तेजस्वी महिला मंडळाच्या अध्यक्षा व अंधेरीतील सामाजिक धडाडीच्या कार्यकर्त्या कल्पना इंगोले यांचे चिरंजीव अक्षय यांचा वाढदिवस नुकताच त्यांच्या निवासस्थानी साजरा करण्यात आला. यावेळी अक्षयचे अभिष्टचिंतन करून त्याला आशीर्वाद देण्यासाठी अनेक महिला कार्यकर्त्या तसेच कल्पना ताई यांचे नातेवाईक आणि सहकारी मित्र परिवार हजर होता. यात राजक्का माने, सविता कडवे, चित्रा परब, सुमन इंगोले, मनीष इंगोले,अक्षय इंगोले, उज्वला इंगोले उपस्थित होते.

# जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगासाठी मध्यस्थ म्हणून काम करण्यास इच्छुक उमेदवारांनी २ मार्च पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन!

नवी मुंबई : कोंकण भवन येथील ठाणे अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगामधील मध्यस्थ कक्षाकरीता मध्यस्थांची नामिका तयार करण्यासाठी मध्यस्थ म्हणून काम करण्यास इच्छुक असणाऱ्या उमेदवारांकडून दि.२ मार्च २०२२ पर्यत अर्ज मागविण्यात येत आहेत. मध्यस्थ म्हणून काम करण्यास इच्छुक उमेदवारांकरीता आवश्यक शैक्षणिक आर्हता, त्याअनुषंगाने अटी व शर्ती या केंद्र सरकारच्या दि.१५ जुलै २०२० च्या केंद्र शासनाच्या ग्राहक संरक्षण नियम तसेच दि.२४ जुलै २०२० च्या राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या ग्राहक नियमामध्ये नमुद केल्याप्रमाणे राहतील. उमेदवाराने कृपया या कायद्यातील तरतूदी व त्याअनुषंगिक नियमांचे अवलोकन करावे. याबाबतची विस्तृत जाहिरात, विहित अर्जाचा नमुना, कायद्यातील तरतूदी व इतर नियम, राज्य आयोग व जिल्हा आयोगाचे पत्ते, दूरध्वनी क्रमांक इत्यादी सविस्तर माहिती राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या https://grahak.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरील भरती या टॅबमध्ये उपलब्ध आहे. या सुवर्ण संधीचा जास्तीत जास्त उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ठाणे अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे प्रबंधक लता कोंडवीलकर यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

पान १ वरून....

## धारावीत रिक्षावाला भाई बनायला...

टोळ्या आहेत की काय? असा संशय पोलिसांना आल्याने या गुन्ह्याचा तपास मुंबई गुन्हे शाखेकडे सुपूर्त करण्यात आला. मुंबई गुन्हे शाखा कक्ष-५चे पोलीस पथक या गुन्ह्याचा समांतर तपास करू लागले. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) मिलींद भारंबे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) एस. विरेश प्रभू, उप आयुक्त (प्रकटीकरण) निलोत्पल, सहा.पो. आयुक्त (मध्य) नामदेव शिंदे, सहा.पो. आयुक्त (दक्षिण) सोपान निघोट यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष ५ चे प्र.पो. नि. घनश्याम नायर, पो. नि. सदानंद येरेकर, स.पो.नि. सुशांत बंडगर, स.पो.नि. अर्चना पाटील, स.पो.नि. संजय जगताप, स.पो.नि. अमोल माळी, स.पो.नि. जयदीप जाधव, पो.उ.नि. लक्ष्मण वडरे, स.फौ. यादव, स.फौ. साळुंखे, स.फौ. अंकुश न्यायनिर्गुने, वायंगणकर, देसाई, घाडगे, निरभवने, विचारे, पो.ना. सिंग, चिलप, पाटील, जाधव, पो.शि. फुंदे, काळे, स.फौ. भुजबळ, पो.ह. राणे, मुलाणी, सावंत, पाटील, म.पो.ना. शिंदे, साळवी, पाटील तसेच स.फौ. चालक/ घोरपडे व पो. ना. काबंळे इत्यादि करू लागले. गुन्हे शाखेच्या पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून हल्ला करणाऱ्या अज्ञात व्यक्तींचा शोध सुरू केला. त्या दृष्टीने पोलीस तपास करत होते. मात्र स्थानिक रहिवाशी यांच्या कडून आरोपीबाबत कुठलीच माहिती मिळत नसल्याने या गोळीबाराचे गूढ वाढले होते. पोलिसांचा तपास सुरू असताना, या गुन्ह्यातील एका संशयित महिलेला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी तिची चौकशी केल्यावर या गुन्ह्याचे बाबत बरीच माहिती पुढे आली. ही हत्या टोळी वादातून झाल्याची माहिती उघड झाली होती. टोळीप्रमुख कलीम रौफ सय्यद याने धारावी परिसरात वर्चस्व प्रस्थापित करायच्या उददेशाने हे कृत्य केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. मात्र आरोपीतांचा शोध घेतला असता त्यांचे मोबाईल फोन बंद असल्याचे आढळून आले. तसेच आरोपी हे मुंबई येथील मूळ रहिवासी नसल्याने व परिसरात त्यांची दहशत असल्याने त्यांच्याबाबत उपयुक्त माहिती मिळून येत नव्हती. त्यामूळे स.पो.नि.माळी, स.पो.नि. जाधव व पथक यांनी आरोपींच्या सोशल मिडीया व जुन्या वापरा मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण करून त्याआधारे आरोपी सईद अनिस शेख, अफसर शेख या दोन मुख्य हल्लेखोरांसह साहिल शेख, सदामहुसेन शेख, शोएब खान, यासिन शेख या सहा जणांना वडाळा, मुंब्रा, कुर्ला व गुजरातच्या सुरत मधून ताब्यात घेवून अटक करण्यात आली. अटक आरोपी हे सर्व गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत. त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता गुन्ह्याची माहिती पुढे आली. ती अशी! आमिर खान हा साधा रिक्षचालक असला तरी त्यांची धारावी परिसरात दहशत होती. त्याच्या दादागिरीमुळे के कंपनीच्या गुंडांचा दबदबा कमी होत चालला होता. के कंपनीला त्याचे वर्चस्व सहन होत नव्हते. म्हणून त्याचा काटा काढण्याचा के कंपनीने बेत आखला. या टोळीचा प्रमुख कलीम रौफ सय्यद हा सद्या मोक्का गुन्हयातील पाहिजे आरोपी असून तो सध्या अंमलीपदार्थ विक्रीच्या गुन्हयात आर्थर रोड कारागृहात जेरबंद आहे. या टोळी प्रमुखास धारावी परिसरात स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करायचे होते. त्यासाठी आमिर खान हा मार्गातील मोठा अडसर ठरत होता. तो धारावीत दादागिरी करून के कंपनीला चायलेंज देऊ पाहत होता. त्याचे वर्चस्व कमी करण्यासाठी कलीम रौफ सय्यद याने मागील १ महिन्यापुर्वी न्यायालयीन तारखेच्या वेळी आपल्या साथीदारांसह आमिर खान याचा खून करण्याचा नियोजनबध्द कट रचला होता. त्याप्रमाणे टोळीचे हस्तक यांनी अलीगड व कलकत्ता येथून शस्त्रे प्राप्त केले होते. त्यानुसार दि.१२ जानेवारी रोजी सकाळी १०:३० वा. ते १०:४५ चे दरम्यान मयत आमिर खान यावर ठरलेल्या कटाप्रमाणे पाळत ठेवून तो शौचास गेला असताना त्यावर आरोपी यांनी गोळीबार करून अमिरची हत्या करून घटनास्थळी वरून पळ काढला. मात्र गुन्हे शाखेच्या पथकाने या गुन्ह्याची पाळेमुळे खोदून काढून सईद अनिस शेख, अफसर शेख या दोन मुख्य हल्लेखोरांसह साहिल शेख, सदामहुसेन शेख, शोएब खान, यासिन शेख व शमा परवेझ शेख या महिलेसह एकूण ७ जणांना अटक केली. हे सर्व आरोपी के कंपनी या नावाने लोकांमध्ये दबदबा निर्माण करून संघटित गुन्हेगारी चालवित असल्याचे दिसून आले. या गुन्हयात अटक करण्यात आलेल्या आरोपीतांनी गुन्हा करतेवेळी वापरलेले २ पिस्टल, १ गावठी कटट्टा व १५ जिवंत काडतुसे तसेच २ चॉपर, १ कोयता हस्तगत करण्यात आले आहे. तसेच आरोपीतांनी गुन्हा केल्यानंतर घटनास्थळावरून पलायन करतेवेळी वापरलेली मोटरसायकल हस्तगत करण्यात आली आहे. अशाप्रकारे पाहिजे आरोपी यांचा कोणत्याही प्रकारे सुगावा लागत नसताना तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे कक्ष ५ यांनी अथक परिश्रम घेवून खूनाच्या गुन्हयातील पाहिजे आरोपीतांना अटक करून गुन्हयाची उकल केलेली आहे.

## मुलापेक्षा अधिक होता प्रियकराचा...

घ्यायचे आहेत असे सांगून आपल्या घरी आणले होते. पण रात्रीच्या वेळी विद्याचा प्रियकर तिच्याकडे यायचा आणि त्यांची रासलीला चालायची हे मुलाला आवडले नाही. म्हणून त्याने विरोध करायला सुरवात केली. त्यामुळे विद्याने प्रियकराच्या मदतीने त्याचा गळा आवळला. मात्र तो बेशुद्ध पडताच तिचे मातृत्व जागे झाले आणि तिने त्याला ससून हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेले.

तिथे सात दिवस त्याच्यावर उपचार सुरु होते. मात्र त्याने उपचाराला फारसा प्रतिसाद दिला नाही आणि उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर पोलिसांनी त्याची आई विद्या हिची चौकशी केली असता ती उडवा उडवीची उत्तरे देऊ लागली. पण पोलिसांपुढे तिचा टिकाव लागला नाही आणि तिने गुन्हा कबुल करताच तिला अटक करण्यात आली.

पान ८ वरून...

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने...

प्रा.लक्ष्मीकांत खरटमोल, जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी दामावले, जिल्हा संघटक बालाजी शेरखाने, युवक जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत कांबळे, युवक शहराध्यक्ष आकाश दुर्गे, आशिष परदेशी, सचिन सुरवसे, ॲड.विजय अवचरे, मुन्ना हाष्मी, भरत लोंढे, नितीन चालक, अहेमद हरणमारे, इस्माईल शेख, विजय कुरील, हिरालाल दिवेकर, बौद्धचार्य केशव कांबळे, सुर्याने लातूरकर, वैजनाथ माने, ॲड.विजय अवचारे, ॲड. संजय सितापुरे , अहेमद हरणमारे, भारत लोंढे, आतिष कांबळे, गटाई कामगार अध्यक्ष परमेश्वर कांबळे, काशीनाथ अप्पा टेंकाळे, मुन्नाभाई हाश्मी, दिगंबर गायकवाड, ज्ञानोबा कांबळे सह नागरिक उपस्थित होते.

## भिवंडीत शिवजयंती मोठ्या उत्साहात ...

विभाग प्रमुख गिरीश घोष्टेकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय विभाग प्रमुख नेहाला मोमीन, आरोग्य निरीक्षक अशोक संखे, पर्यावरण विभाग प्रमुख नितेश चौधरी, अन्य अधिकारी, कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुळखेडा येथे विविध विकास कामांचा ...

सन २०२१-२०२२ या वर्षात जवळपास गावातील वैयक्तिक योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जिवनात क्रांती केली असून शेतकऱ्यांच्या लाभांच्या यशस्वी योजना राबवत ४८लाख ३१५४८ रुपये ची विकास कामे राबवली असून त्यामध्ये वैयक्तिक सिचन विहीर, सार्वजनिक सिंचन विहीर, फळबाग लागवड, जनावरांच्या गोठा या माध्यमातून गुळखेड्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवून आणली आहे. त्यामुळे गावच्या विकासासाठी हातभार लागला असुन रोजगार सेवकांच्या प्रयत्नामुळे गावचा कायापालट झाला आहे. रोजगार सेवकांच्या कार्यांचे शेतकऱ्यांकडून कौतुक केले जात आहे. आज गुळखेडा येथील ११ शेतकऱ्यांना जनावरांच्या गोठ्यांचे मार्कावट देण्यात आले यावेळी गावचे सरपंच पती बबन चेंडके, ग्रामपंचायत सदस्य भास्कर यादव महालिंग गिराम, खुदुस पटेल, शिवाजी आळणे, नानासाहेब भोसले, भास्कर भोसले, सुभाष सिरसले, गोविंद दाणे, महेश गिराम, शिवशंकर गिराम, सुलेमान शेख, जमिल शेख, गोरोबा रोंगे, जिवन चिलबिले, सर्वलिंग चिलबिले, बब्रुवान भोसले पंचायत समिती चे तांत्रिक अधिकारी अबरार तांबोळी, रोजगार सेवक पांचाळ विठ्ठल, राजकुमार कांबळे, निळकंठ तळेकर, यांच्या सह अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना रोजगार सेवक पांचाळ विठ्ठल म्हणाले की गुळखेडा ग्रामपंचायत अंतर्गत नरेगा विभागातून गावासाठी निधी हा गटविकास अधिकारी सुर्यकांत भुजबळ यांच्या सहकार्याने मिळाला असून त्यांनी आम्ही मागणी केलेल्या सर्व कामांना तात्काळ मंजुरी दिल्याने हे सर्व शक्य झाले आहे. असे ते म्हणाले. भुजबळ साहेब यांच्या सारख्या कर्तव्य दक्ष व कार्यतत्पर अधिकारी असल्याचे गावासाठी इतक्या मोठा निधी मिळवू शकलो.

क्राईम संध्या सोमवार दि. २१ फेब्रुवारी २०२२ ते रविवार दि. २७ फेब्रुवारी २०२२ लातूर/पालघर/सोलापूर www.crimesandhya.com ७

# वैद्यकीय अधिक्षक डॉ. निळकंठ सगर यांचा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने कार्यगौरव सोहळा



**देवणी/शकिल मनियार**

देवणी सारख्या ग्रामीण रुग्णालयात आपरेशनच्या सोयी सुविधा उपलब्ध नाव्हत्या. एखाद्या गरीब रुग्णास शस्त्रक्रिया करण्यासाठी उदगीर लातुर सारख्या शहरात प्राव्हेट रुग्णालयात जावे लागत असे व त्याठिकाणी वेळ व पैसा या दोन्ही गोष्टी जात असे, परंतु दिनांक २ जुन २०१८ रोजी डॉ. निळकंठ सगर हे देवणी येथे वैद्यकीय अधिक्षक म्हणून पदभार स्वीकारला. शहर व तालुक्यातील गरजु व गरीब रुग्णासाठी पहिल्यांदा आपरेशन थीयटरची सोयी सुविधा उपलब्ध करून हार्णीया, हायड्रोसील, आपेंडेक्स, भगंदर (मुळव्याद), वेरीकोसेल, लायपोमा सर्जरी, स्त्रीयांच्या स्थनातील गाठी, महिलांच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, फक्चर असलेल्या पेंशटला प्लास्टर चढवणे अदि प्रकारच्या चारशेहून अधिक शस्त्रक्रिया आजतागायत पर्यत येथील ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक डॉ. निळकंट सगर यांनी केल्याने त्यांचा शनिवारी ग्रामीण रुग्णालयात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने केलेल्या कार्याचा कार्यगौरव सोहळा घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी अल्पसंख्याक सेलचे प्रदेश महासचिव प्राचार्य फकरोद्दीन बुदरे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष प्रा.डॉ. अनिल इंगोले, प्रदेश सचिव मनोज कन्नाडे, डॉ. सेलचे तालुकाध्यक्ष डॉ.मल्लीकार्जुन सुरशेट्टे, शहराध्यक्ष अमरनाथ मुर्के, अमरदिप बोरे, मुकतार तांबोळी, संदिप पाटील, सिद्धेश्वर पाटील, लक्ष्मण रणदिवे, शकिल मनियार, कृष्णा पिंजरे, दत्ता चाळकापुरे, गफुर, खुरेशी, सचिन घाळे, सचिन गवळी सह राष्ट्रवादी काँग्रेस चे असंख्य पदाधीकारी उपस्थित होते. यावेळी डॉ. कल्याणे वैद्यकीय आधिकारी बालरोग तज्ञ, डॉ. अन्थोनी RBSK वैद्यकीय अधिकारी, डॉ. जनवाडकर १०८ अँब्युलन्स वैद्यकीय अधिकारी यांचा पण सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ. अनिल इंगोले यांनी केले, तर आभार मनोज कन्नाडे यांनी मानले. यावेळी ग्रामीण रुग्णालयातील सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# ऊस गाळपासाठी प्राधान्याने घेऊन जाण्यात यावा यासाठी मनस दिले उप जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**देवणी/प्रतिनिधी**

या वर्षीच्या गळीत हंगामात विकास २ साखर कारखाना तोंडार पाटी उदगीर यांनी कार्यक्षेत्रातील म्हणजे साखर कारखान्यापासून ४० किमी अंतरातील ऊस गाळपासाठी प्राधान्याने घेऊन जाणे बंधनकारक असताना सुध्दा नियमांना बगल देत कार्यक्षेत्राच्या बाहेरील ऊस नेण्यावर भर दिल्याने उदगीर क्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. गेल्यावर्षी नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये तोडलेला ऊस अद्यापही कारखान्याने घेऊन गेलेले नाहीत. त्यामुळे हा ऊस बारा महिन्याच्या आत गाळपासाठी गेल्यास त्याचे वजन योग्य भरते व शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळतो, पण उदगीर कार्यक्षेत्रातील अनेक शेतकऱ्यांच्या उसाला १३ ते १५ महिने झाल्याने आता तो ऊस निबरत असून त्यास तुरे आलेले आहेत. ऊस वाळत असल्याने उसाचे आपोआपच वजन कमी होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे नुकसान होत आहे, तरी यापुढील शेतकऱ्यांचे होणारे



नुकसान थांबून ऊस नेण्याची नियोजित वेळ झालेल्या शेतकऱ्यांच्या उसाच्या फडाला तात्काळ गाड्या लावून ऊसतोडणी सुरू करावी अन्यथा नफेखोरीसाठी कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या विकास २ साखर कारखान्याच्या मॅनेजमेंट विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेस तीव्र आंदोलन हाती घ्यावे लागेल. तसेच कार्य क्षेत्राबाहेरील उसाच्या गाड्या कारखान्यात गाळपासाठी येऊ देणार नाही याची नोंद घ्यावी असे निवेदन उपजिल्हाधिकारी उदगीर यांना देण्यात आले. या निवेदनावर जिल्हा उपाध्यक्ष संजय राठोड, तालुकाध्यक्ष संग्राम रोडगे, शेतकरी सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष रामदास पाटील, शहराध्यक्ष अभय सूर्यवंशी, उप जिल्हाध्यक्ष विजय देवडवार, शेतकरी सेना जळकोट तालुकाध्यक्ष महेश देशमुख, विद्यार्थी सेना जळकोट तालुकाध्यक्ष शुभम चंदनशिवे, शहर उपाध्यक्ष लखन पुरी, दत्तात्रय रेड्डी, उमेश तेलंगे, विष्णुकांत अंधारे आदिच्या स्वाक्षरी आहेत.

# देवणी नगरपंचायतीच्या सभापती पदाच्या निवडी बिनविरोध

**देवणी/प्रतिनिधी**

येथील नगरपंचायतीच्या विषय समिती सभापतीच्या बुधवार दिनांक १६ रोजी झालेल्या निवडी बिनविरोध संपन्न झाल्या. बुधवारी झालेल्या विषय समिती सभापतीच्या निवडीत काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वच सभापती बिनविरोध निवडण्यात आले आहेत. बिनविरोध निवड झालेल्या विषय समिती सभापतीमध्ये सार्वजनिक बांधकाम समितीच्या सभापतीपदी प्रा.अनिल इंगोले यांची तर पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती सभापती पदी नदिम मिर्झा यांची तर महिला व बाल विकास समिती सभापतीपदी भाग्यलक्ष्मी रेवण मळभगे यांचे तर स्वच्छता व आरोग्य समिती सभापती पदी शारदा अश्विन लांडगे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. स्थायी समिती सभापती पदी नगराध्यक्षा डॉ. कीर्तीताई घोरपडे यांची तर नियोजन व विकास समिती सभापतीपदी उपनगराध्यक्ष अमिरत मानकरी यांची पदसिद्ध पणे निवड जाहीर करण्यात आली आहे. झालेल्या विषय समिती सभापतीच्या निवडीच्या पीठासन अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी शोभा जाधव तर सहाय्यक म्हणून मुख्याधिकारी एस.ए. बोंदर हे उपस्थित होते. देवणी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा डॉ. किर्तीताई संजय घोरपडे यांच्या तर्फे सर्व विषय समितीच्या सभापती, नगरसेवक व नगरसेविका आणि ज्येष्ठ नागरिकांचे यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.संजय घोरपडे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार चंद्रकांत मोटेरावे यांनी केले.

# देवणी नगरपंचायत बांधकाम सभापतीपदी प्रा.अनिल इंगोले यांची निवड झाल्याबद्दल सत्कार



**देवणी/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष प्रा.डॉ.अनिल इंगोले यांची देवणी नगरपंचायतीमध्ये बांधकाम सभापती पदी निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव मनोज कन्नाडे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्याध्यक्ष अनिल कांबळे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष संदीप पाटील, सरपंच यशवंत कांबळे, उपाध्यक्ष अनिल रोटे, शकील मनियार, लक्ष्मण रणदिवे, संजय, मुराळे, मल्लिकार्जुन म्हेत्रे, असलम तांबोळी, यांच्यासह राष्ट्रवादीचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## थोडक्यात वृत्तांत

### भिवंडीत दहा किलो गांजा जप्त

**भिवंडी** : गांजा विक्रीवर बंदी असतानाही स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी चोरीच्या मार्गाने गांजा विक्री करण्यासाठी तरुण येत असल्याची खबर पोलिसांना लागल्यानंतर पोलिसांनी नायगाव रोड गायत्री नगर येथे गांजाची साठवणूक व विक्री करणाऱ्या एका २५ वर्षीय तरुणाला शांतीनगर पोलिसांनी सोमवारी अटक केली आहे. विनोद विठ्ठल काचरे (वय २५ वर्षे) राहणार गायत्री नगर असे गांजा विक्री प्रकरणी अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. गांजा विक्री व साठवणूक करण्यास बंदी असतानाही आरोपी विनोद याने दहा किलो दोनशे ग्रॅम वजनाचा गांजा आपल्याकडे बाळगला होता. पोलिसांनी त्याच्याकडून रोख रक्कम मोबाईल व दहा किलो दोनशे ग्रॅम गांजा असा एकूण दोन लाख ७३ हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे याप्रकरणी स्थानिक शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे.

### शासकीय बालगृहासाठी इमारत भाडे तत्वावर घेण्यासाठी संपर्क करावा!

पालघर : शासकीय बालगृह पालघर जिल्ह्यात सुरु करण्यासाठी ५० अनाथ, निराधार, निराश्रीत मुलांसाठी सर्व सोयीयुक्त ईमारतीची आवश्यकता आहे. बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ व नियम २०१८ प्रमाणे एकुण ९००० चौ.फुट व असल्यास क्रिडांगण या प्रमाणे क्षेत्रफळ असलेली इमारत पालघर शहरात किंवा जवळपासच्या परिसरात भाडे तत्वावर आवश्यक आहे. या प्रमाणे स्वतंत्र व स्वताच्या मालकीची इमारत भाडे तत्वावर द्यावयाची असल्यास संबंधीत इमारत मालकांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पालघर मातोश्री बंगला, पहिला मजला आर्यन हायस्कुल मागे, विष्णु नगर रोड, पालघर (प.) येथे ७ दिवसाच्या आत आवश्यक त्या कागदपत्रांसह त्वरीत संपर्क करावा.

### २१ फेब्रुवारी रोजी महिला लोकशाही दिन

पालघर : महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास शासन विभाग निर्णय क्र.मलोदि-२०१३/प्रक्र.११/मक/दिनांक:-०४/०३/२०१३ अन्वये जिल्हा स्तरावर महिला लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी म्हणजेच या महिन्याचा महिला लोकशाही दिन हा दि. २१/२/२०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे आयोजित करण्यात येत आहे. महिला लोकशाही दिनाचा अर्ज जिल्हाधिकारी यांना उद्देशून असावा. तालुका महिला लोकशाही दिन टोकन क्रमांक व तहसीलदार यांच्या उत्तराची प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी महिला लोकशाही दिनाच्या १५ दिवसाच्या अगोदर अर्ज जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, मातोश्री बंगला, आर्यन ग्राउंड च्या शेजारी, विष्णू नगर रोड, लोकमान्य पाडा, पालघर ई मेल- dwcdopalghargmail.com फोन नं. ०२५२५-२५७६२२ यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह सादर करावा. असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पालघर यांनी केले आहे.

### देवणी पंचायत समिती स्थापत्य अभियांत्रिकी साह्यक तुकाराम नरवटे एसीबीच्या जाळ्यात

देवणी : येथील पंचायत समिती कार्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी साह्यक अरोपी तुकाराम पुंडलिक नरवटे वय २७ रा.देवणी याने कोणाळी ता.देवणी येथील फिर्यादी महेंद्र रमेश काळे वय २२ वर्ष यांच्या वडीलांच्या नावे स.न.२०१९-२० मध्ये रमाई घरकुल योजनेअंतर्गत मिळालेल्या घरकुलाचा शेवटचा हप्ता २० हजार रुपये फिर्यादीच्या वडीलांच्या बँक खात्यावर जमा करून देण्याच्या कामासाठी पंचासमक्ष फिर्यादी यांच्याकडे सुरुवातीस दहा हजार रुपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती नऊ हजार रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम नऊ हजार रुपये दि.१८/२/२२ रोजी पंचायत समिती देवणी येथील घरकुल विभागामध्ये स्वतःच्या कार्यालयात स्वतः पंचासमक्ष स्विकारल्यामुळे फिर्यादीवरुन देवणी पोलीस ठाण्यात गु.र.न ३२/२०२२ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ नुसार गुन्हा दाखल झाला असुन पुढील तपास पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजीतवाड हे करीत आहेत.

# पारधी समाज बांधव अस्मिता जनजागरण मेळावा




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील पारधी समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊन तरुण तरुणींनी पारंपारिक शिक्का पुसून स्वतःची वेगळी व स्वतंत्र ओळख निर्माण करावीत यासाठी सोलापूर ग्रामीण पोलीस दल सदैव पाठीशी राहणार आहे, असे आवाहन सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी पारधी समाज बांधव अस्मिता जनजागरण मेळावाच्या वेळी केले. सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने मंगळवारी सोलापुरातील हैद्राबाद रस्त्यावरील मोतीवाला मल्टीपर्पज हॉलमध्ये पारधी समाज बांधव अस्मिता जनजागरण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते बोलत होते. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, पोलीस उपअधीक्षक सूर्यकांत पाटील, पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील, सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरुण घुगे, आनंद काजळकर, कामती पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश माने, वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस अतुल भोसले, सहाय्यक फौजदार खाजा मुजावर, नारायण गोलेकर उपस्थित होते. यावेळी तेजस्वी सातपुते म्हणाल्या येणाऱ्या काळात पारधी समाजातील तरुण व तरुणांना नोकरीची संधी पोलिस दलाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शिक्षित तरुणांनी या संधीचा फायदा घेऊन आपले भविष्य उज्वल करून घ्यावे. येत्या २५ ते २७ फेब्रुवारी दरम्यान इतर जिल्ह्यातील विविध कंपन्यांचे प्रतिनिधी नोकरी मेळाव्यानिमित्त सोलापुरात येणार आहेत. त्यामध्ये जिल्ह्यातील पारधी समाजातील तरुण तरुणींनी सहभाग नोंदवावा. मेळाव्यात निवड होणाऱ्या तरुणांना जागेवरच नियुक्तीपत्र दिले जाणार आहे. या मेळाव्यात जवळपास ४० टक्के विद्यार्थ्यांना संधी मिळणार असल्याचेही तेजस्वी सातपुते यांनी यावेळी म्हणाले.

# भिवंडीत २५० दुचाकींना मोफत पेट्रोल



भिवंडी : देशात पेट्रोल चे भाव शंभरी पार गेले परंतु सर्वसामान्यांचे उत्पन्नां मध्ये वाढ न झाल्याने सर्वसामान्यांचे अर्थकारण बिघडले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत भिवंडीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी प्रवीण पाटील यांनी कल्याणनाका येथील सुंदरबेनी पेट्रोलपंप येथे मोफत पेट्रोल वितरण करून वाढदिवस साजरा केला आहे. प्रवीण पाटील यांसह युवक अध्यक्ष आसिफ खान, नामदेव आहेर, गायसुद्दीन अन्सारी यांसह असंख्य कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात तब्बल २५० दुचाकी स्वारांना प्रत्येकी १०० रुपयांचे पेट्रोल वितरण करण्यात आले. या उपक्रमा मुळे मोफत पेट्रोल मिळण्याने दुचाकीस्वार सुखावले होते.

# देवणी पोलीस ठाण्यात शांतता कमिटीची बैठक



**देवणी/प्रतिनिधी**

शिवजयंती निम्मीत्त देवणी पोलीस ठाण्यात शुक्रवारी पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे यांच्या अध्यक्षतेखाली शांतता कमीटीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस देवणी तालुक्यातील सर्व गावातील पोलीस पाटील उपस्थित होते. तसेच देवणी नगरपंचायतचे नुतन नगरसेवक किशोर निडवंचे, नदिम मिर्झा, प्रविण बेळ्ळे, जमीर तांबोळी, अमीत मानकरी, अमित सुर्यवंशी, जाफर मोमीन, बाबुराव इंगोले, माणीकराव लांडगे सह प्रतिष्ठित व्यक्ती, पत्रकार उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पो.नि.सोंडारे यांनी १४ फेब्रुवारी २०२२ महाराष्ट्र शासन नियमवाली परिपत्रकाचे उद्दिष्ट सांगुन शांततेत शिवजयंती साजरी करण्याचे आवाहन केले. यावेळी सुत्रसंचलन पोलीस नाईक अक्रम शेख यांनी केले, तर आभार पो.उ नि मुजाहेद अली शेख यांनी मानले.

# पर्यटन संचालनालयामार्फत द्राक्ष महोत्सवाचे आयोजन

**मुंबई/प्रतिनिधी**

महाराष्ट्र पर्यटन संचालनालयामार्फत पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथे १९ ते २१ फेब्रुवारी या काळात दिवस द्राक्ष महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात द्राक्षांच्या बागांतून फेरफटका, द्राक्षांच्या विविध व्यंजनांचा स्वाद चाखण्याची संधी मिळणार आहे. या काळात विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच खाद्य महोत्सव, कृषी पर्यटन आदीचे आयोजन करण्यात आले आहे. जुन्नर मध्ये आयोजित द्राक्ष महोत्सवाचे पाचवे वर्ष आहे. या महोत्सवात पर्यटन व्यवसायाला चालना मिळेल, तसेच कलाकुसर करणारे कारागीर, बचतगट, लघु उद्योजकांच्या व्यवसायाला हातभार लागेल.




द्राक्ष महोत्सवाचे उद्घाटन १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता होईल. यामध्ये विविध जातींची द्राक्षे, द्राक्षांपासून बनवलेल्या विविध खाद्यपदार्थाचा तसेच बहारदार द्राक्षांच्या बागांमध्ये फिरण्याचा अनुभव घेता येणार आहे. महोत्सवामुळे पर्यटकांना हेरीटेज वॉक अंतर्गत जुन्नर शहराला लाभलेला ऐतिहासिक वारसा पाहण्याची संधी मिळणार असून, या वॉकमध्ये पंचलिंग मंदिर, शिवसृष्टी, मुघलकालीन खापरी पाईपलाईन, सौदागर घुमट, हबशी महाल इत्यादी ठिकाणांना भेट देण्याची संधी मिळणार आहे. रात्री पर्यटकांसाठी कॅम्प फायरची व्यवस्था असणार आहे. जुन्नरमधील देवराईमध्ये किंवा वनपरिक्षेत्रांत निसर्गप्रेमी आणि पक्षीप्रेमींना पक्षी निरीक्षण उपक्रमात सहभागीही होता येणार आहे. तसेच कुकडेश्वर मंदिर, नाणेघाट इत्यादी ठिकाणी भेटीचे आयोजन करण्यात आले आहे. शेवटच्या दिवशी २१ फेब्रुवारी रोजी हडसर किल्ला किंवा पर्वत गडावर ट्रेकिंगचे आयोजन केले जाणार आहे. त्यानंतर ओझर गावातील गणपती, गीब्सन स्मारक, अंबा अंबिका लेणी समूह, ताम्हाणे संग्रहालय, लेण्याद्री गणपती आदींचे दर्शन घेता येईल. तसेच स्थानिक जुन्नरच्या आठवडी बाजारांमध्ये जाऊन तेथील बाजार पाहता येईल व खरेदी करता येईल. पर्यटक इथे येऊन शेतातील ताज्या द्राक्षांचा आस्वाद घेऊ शकतात. पर्यटक, शेतकरी आणि व्यावसायिक समूदाय यांनी एकत्र येऊन द्राक्षाच्या बाजारपेठेसाठी आर्थिकदृष्ट्या उचललेले हे अत्यंत महत्वाचे पाऊल असणार आहे, अशी माहिती पर्यटन विभागाच्या, पुणे येथील उपसंचालक सुप्रिया करमरकर यांनी दिली आहे.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०२२ च्या स्पर्धा परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर

नवी मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि परीक्षा घेणाऱ्या इतर संस्थांच्या परीक्षा एकाच दिवशी येणार नाही व उमेदवारांचे नुकसान होणार नाही. या उद्देशाने विधीमंडळात देण्यात आलेल्या आश्वासनानुसार सन २०२२मध्ये आयोगातर्फे आयोजित स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक निश्चित केल्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबईचे सह सचिव सुनिल अवताडे यांनी कळविले आहे. शासनाच्या मागणीनुसार शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरिता आयोगामार्फत वर्षभर विविध परीक्षांचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार सन २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध परिक्षांचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. या वेळापत्रकात स्पर्धा परिक्षांचे नाव, जाहिरातीचा दिनांक, पूर्व परीक्षेचा दिनांक, पुर्व परिक्षेच्या निकालाचा महिना, मुख्य परिक्षेचा दिनांक, मुख्य परिक्षेच्या निकालाचा महिना या सर्व बाबी सविस्तरपणे नमूद करण्यात आल्या आहेत. वेळापत्रक आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. हे वेळापत्रक अंदाजित असून जाहिरातीच्या अथवा परीक्षेच्या प्रस्तावित महिना किंवा दिनांकामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होऊ शकतो. असे बदल झाल्यास ते वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. या परीक्षांच्या वेळापत्रकाबाबत विधीमंडळातील वारंवार झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावित वेळापत्रक निश्चित करतांना कोणत्याही परीक्षा एकाच दिवशी येणार नाही. याची आयोगामार्फत दक्षता घेण्यात आली आहे.




# शिक्षकांनी विद्यार्थ्यांत वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करावा -तेलंग



**लातूर/प्रतिनिधी**

विज्ञानाच्या जोरावर सर्व अडचणींवर मात करता येते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधून त्यांच्यात असलेली अंधश्रद्धा दूर करण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करावा. तसेच शिक्षक व शिक्षण क्षेत्रात काम करणार्यांनी नवनवीन संशोधन करीत 'अधिकारी आपल्या दारी', 'शिक्षक दरबारी' असे उपक्रम राबवावेत, असे आवाहन लातूर विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग यांनी केले. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व नियोजन संस्था, नवी दिल्लीच्या वतीने नाविण्यपूर्ण राष्ट्रीय शैक्षणिक पुरस्कार २०१९ - २०२० हा पुरस्कार तेलंग यांना नुकताच प्रदान करण्यात आला. त्याबद्दल राजपत्रित संघटनेच्यावतीने तेलंग व त्यांच्या सुविद्य पत्नी उषा तेलंग यांचा बुधवारी सत्कार करण्यात आला, त्यावेळी सत्काराला उत्तर देताना तेलंग बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी, उस्मानाबादचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी अरविंद मोहरे, उपशिक्षणाधिकारी ज्ञानेश्र्वर मोरे, नांदेडचे उपशिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे, सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी राम गारकर, प्रशासन अधिकारी प्रमोद पवार, वसंतराव पाटील, प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्रा. गोविंदराव घार, प्रभाकर बंडगर, सुरेश गायकवाड, सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक अनुपमा भंडारी, शिवकांत वाडीकर, परमेश्र्वर गित्ते आदी उपस्थित होते. सुधाकर तेलंग हे सांगली येथे शिक्षणाधिकारी असताना त्यांनी सूर्योत्सव सांगली - २०१९ हा उपक्रम सूर्यग्रहणाच्या दिवशी सुमारे १० हजार विद्यार्थ्यांना एकत्र घेऊन छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमवर सेवानिवृत्त व अनुभवी खगोल शास्त्रज्ञांकडून विद्यार्थ्यांत वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी खगोलीय, भूगोल व अवकाश या विषयांत रुची निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी सूर्योत्सव सांगली हा उपक्रम राबविला. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून सूर्यग्रहणाबद्दल असलेली अंधश्रद्धा व मनात असलेली भीती दूर करण्याचा या माध्यमातून प्रयत्न केला गेला. यासोबतच सूर्यग्रहण कालावधीत विद्यार्थ्यांसोबत चहा व बिस्किटांचा स्वाद घेतला गेला. तेलंग यांच्या या व इतर उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व नियोजन संस्था, नवी दिल्लीच्यावतीने तेलंग यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्याबद्दल हा सत्काराचा कार्यक्रम घेण्यात आला. तसेच सुरेश गायकवाड यांची गटशिक्षणाधिकारी पदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले तर प्रास्ताविक नांदेड जिल्हा परिषदेचे माध्यमिकचे शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर यांनी केले. आभार नांदेडचे उपशिक्षणाधिकारी माधव सलगर यांनी मानले.



देवणी तहसीलदार सुरेश घोळवे यांना क्राईम संध्या लातूर जिल्हा दैनंदिन डायरी भेट देताना तालुका प्रतिनिधी शकिल मणियार.



पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे व पोउनि मुजाहेद अलि शेख यांना क्राईम संध्या डायरी २०२२ भेट देताना तालुका प्रतिनिधी शकिल मणियार.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने गुरू रविदास जयंती उत्साहात साजरी



**लातूर/प्रतिनिधी**

येथील राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने गुरू रविदास जयंतीनिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक (पुर्व भाग) येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लोकप्रिय खासदार सन्माननीय, सुधाकररावजी शृंगारे साहेब, व्ही.एस.पँथर्सचे सं.अध्यक्ष विनोद खटके, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सी.के. मुरळीकर हे उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर गुरू रविदास यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने खासदार साहेबांचा सत्कार करण्यात आला. तसेच सी.के.मुरळीकर यांनी खासदार साहेबांच्या हस्ते राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या गुरू रविदास दिनदर्शिकेचे वितरण करण्यात आले. यानंतर खासदार साहेबांनी जयंतीनिमित्त शुभेच्छा देताना सांगितले की सर्व बहुजन समाजांनी एकत्र येऊन आपला विकास साधावा आणि विकास प्रक्रियेत गतिमान व्हावे असे आवाहन केले. यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष रवि कुरील, जिल्हा कार्याध्यक्ष अनिल कबाडे, जिल्हा सचिव ...पान ६ वर

# वाड्यातील दोन शाळांमध्ये तरुणांसाठी लसीकरण सत्र संपन्न



**वाडा/प्रतिनिधी**

अनेक दिवसांच्या प्रतिक्षे नंतर वाड्यातील पी.जे. महाविद्याल व स्वामी विवेकानंद विद्या मंदिर येथे १५ ते १८ वयोगटातील तरुणांसाठी लसीकरणाचे विशेष सत्र घेण्यात आले. कोरोनाची लाट कांहीं अंशी ओसरली आहे, मात्र अनेक ठिकाणी लसीकरण घेतल्याच्या प्रमाण पत्राची मागणी केली जात असल्याने तरुणांनी लसीकरणाला उत्तम प्रतिसाद दिला आहे. ठाणे येथील सिद्धी विनायक हॉस्पिटल व आरोग्य विभाग,पालघर यांच्या वतीने लसीकरण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रात दुपारपर्यंत आठशे हुन अधिक तरुण - तरुणींनी लसीकरणाचा लाभ घेतला असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय बोरपुल्ले यांनी दिली.

# ज्ञानदा प्रकाशन आणि ज्ञानार्जन साप्ताहिकाच्या वर्धापणदिनी रक्तदान शिबीर व गुणगौरव समारंभ



**वाडा/प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त वाड्यात शनिवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी ज्ञानदा प्रकाशन व ज्ञानार्जन साप्ताहिकाच्या वर्धापणदिनी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्याला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. तर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

या प्रसंगी सईबाई पाटील लिखित लोक गुरू महामानव संत रविदास या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उदघाटन करण्यात आले. ज्ञानदा प्रकाशन व ज्ञानार्जन साप्ताहिकाचे संपादक युवराज ठाकरे, उप संपादिका व नगरसेविका वर्षा गोळे, निहेश गायकवाड यांच्यासह संस्थेच्या इतर सदस्यांनी आलेल्या पाहुण्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. निलेश भोईर, माजी सभापती युवराज ठाकरे, अनंता वणगा, सदर कार्यक्रमास गोळे, माजी सभापती योगेश गवा, शिवसेना पालघर जिल्हा उपप्रमुख सुनील पाटील, गवंडी मजूर कामगार संघटनेचे अध्यक्ष भीमराव बागुल, काँग्रेसचे मनीष गनोरे, काँग्रेसचे पालघर जिल्हा अध्यक्ष प्रफुल पाटील, निलेश पाटील, युवा तालुका प्रमुख, शरद पाटील शिवक्रांती संघटना, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष अमीन सेंदू, सभापती रघुनाथ माळी, सामाजिक कार्यकर्ते कमलाकर पाटील, नगरसेविका भारती सापटे, कामगार संघटनेचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र ठाकरे, माजी सभापती जगदीश पाटील, जिल्हा परिषद सदस्य अरुण पाटील, भाजपचे पालघर जिल्हा अध्यक्ष नंदकुमार पाटील, युवा मोर्चाचे कुणाल साळवी, माजी उपसभापती वैभव ठाकरे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष निलेश गंधे, शिवसेना वाडा तालुका समनव्यक तुषार यादव, नगरसेवक संदीप पवार यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली.

# भिवंडीत शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरा




**भिवंडी/आकाश गायकवाड**

भिवंडी निजामपूर महापालिकेच्या वतीने शिवजयंती निमित्ताने छत्रपती महाराज शिवाजी चौक येथील पूर्णाकृती पुतळ्यास महापौर प्रतिभा विलास पाटील व पालिका आयुक्त सुधाकर देशमुख यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी या चौकाचा छत्रपती शिवाजी महाराज चौक नामफलकाचे अनावरण महापौर प्रतिभा पाटील यांच्याहस्ते करण्यात आले. यानंतर पालिका मुख्यालयात शिव प्रतिमेस महापौर प्रतिभा विलास पाटील व आयुक्त सुधाकर देशमुख यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमास सभागृह नेते विकास निकम, प्रभाग समिती २ चे सभापती प्रशांत लाड, कर विभागाचे उपायुक्त दीपक झिंजाड, शहर अभियंता लक्ष्मण गायकवाड, प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रीतम पाटील, आरोग्य अधिकारी डॉ.कारभारी खरात,जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले, सहाय्यक आयुक्त दिलीप खाने, फैजल तातली, सुनील भोईर, बाळाराम जाधव, मार्केट ...पान ६ वर

# गुळखेडा येथे विविध विकास कामांचा शुभारंभ

## नरेगा मधून ४८ लाख ३९५४८ रुपये निधी मंजूर



**औसा/प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील मौजे गुळखेडा हे ग्रुप ग्रामपंचायत असणारे गाव आहे. या गावात रोजगार सेवकांनी गावात अनेक प्रकारच्या योजना राबवून गावचा कायापालट केला असून गावच्या विकासात मोठ्या प्रमाणात भर झाली आहे. १८ फेब्रुवारी २०२१ रोजी विविध विकास कामांचा शुभारंभ शेतकऱ्यांच्या हस्ते करण्यात आला. ग्रामपंचायत अंतर्गत नरेगा योजना प्रभावी पणे राबवण्यासाठी रोजगार हमी योजनेचा कणा म्हणून रोजगार सेवकांस ओळखले जाते. रोजगार सेवक जर कार्यतत्पर असेल तर गावचा कायापालट होऊन विकास होण्यासाठी वेळ लागणार नाही. गुळखेडा येथील रोजगार सेवक विठ्ठल पांचाळ यांच्या प्रयत्नातून नरेगा विभागाच्या अंतर्गत ...पान ६ वर

**स्वराज्य राज्यव्यापी कामगार संघटना**



नोंदणी क्रमांक - काउआ/ठाणे/१९८०/२०२२ स्थापना : २०२२

संस्थापक अध्यक्ष

**श्री. प्रशांत आर. धोंडे**

संपर्क : ७३५०३१६४८७

कार्यालयीन पत्ता : शॉप नं. ५१८, टेंभी, कोल्हापूर, आगाशी, बाजार पेठ, विरार (प.),ता. वसई, जि. पालघर

संपर्क कार्यालय : महात्मा फुले नगर, चक्रेश्वर अपार्टमेंट समोर, सोपारा रोड, नालासोपारा (प.), ता.वसई, जि. पालघर, Email - prashantdhonde14@gmail.com